।। श्रीराम ।।

।। ॐ श्रीरामकृष्ण ।।

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र.८७

प.पू. श्रीदासराममहाराज केळकर श्रुत

# ।। संजीवनपाठ ।।

(श्रीदासराममहाराजकृत विवरणासह)

संपादक

श्री. दीपक चंद्रशेखर केळकर

प्रकाशक

श्री. विवेक मुकुंद हलदुले

आवृत्ती दुसरी सांगली सन २०२०

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र.८७**

# संजीवनपाठ

(श्रीदासराममहाराजकृत विवरणासह)

**प्रकाशक : श्री. विवेक मुकुंद हलदुले**
ॐ, अ-२४, विनीत सोसायटी, एल.आय.सी. कॉलनी,
राहूलनगर समोर, कोथरूड, पुणे ४११ ०३८

**संपादक : श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकर वाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८ / ९४२०५७४५७०

**प्रकाशन दिन :** मार्गशीर्ष शु. ११, शके १९४२ शुक्रवार दि. २५.१२.२०२०
(प.पू.सद्गुरू श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथी)

**प्रथम आवृत्ती** इ.स.१९८७

**द्वितीय आवृत्ती इ.स. २०२०**

**© सर्व हक्क श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन**

**अक्षर जुळणी :**
श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे

**मुद्रक :**
एस. बी. लिथो प्रेस, सांगली

**स्वागत मूल्य** : रु.५०/-

**प्रत मिळणेचे ठिकाण :**
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकर वाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७
भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८/९४२०५७४५७०
ईमेल - kelkarnana@gmail.com

# प्रस्तावना

महाराष्ट्रामध्ये अलीकडील काळातील संतमहात्म्यांचेमध्ये सांगली येथील श्रीदासराममहाराज हे एक श्रेष्ठ सत्पुरुष आहेत. चिमड संप्रदायिक असलेले श्रीदासराममहाराज आपल्या पारमार्थिक अधिकाराने, आपल्या कार्यकर्तृत्वाने आपल्या संप्रदायाचे भूषण ठरले आहेत. आपले पितृदेव असलेल्या प.पू. श्रीमामामहाराज यांची अखंड नित्यनेमाची ३८ वर्षांची कीर्तन परंपरा, पुढे अखंड ३९ वर्षे सद्गुरू सेवा म्हणून चालविली. नित्यनेमाच्या अखंड कीर्तनाबरोबरच त्यांनी विपुल प्रमाणात मौलिक असे पारमार्थिक लेखन केले आहे.

प.पू.श्रीदासराममहाराज हे विश्वमानव होते. ते चिमड संप्रदायाचे असले तरी, त्यांची अध्यात्मिक दृष्टी विश्वव्यापी होती. 'हे विश्वचि माझे घर' असा त्यांचा दृढभाव होता. त्यांच्या या विश्वव्यापी दृष्टीकोनाचे मूळ, त्यांनी अंगीकारलेल्या चिमड संप्रदायाच्या सर्वव्यापक, विश्वकेंद्री तत्त्वज्ञानामध्ये आढळून येते. चैतन्याचा वारा, विश्वव्यापक शुद्धतम चित् जाणीव हाच खरा देव असून, अशा चैतन्याशी एकरूप झाले असता देवत्व प्राप्त होते, हा सिद्धांत या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.

साधु दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले ।
अवघे मिळोनि एकचि झाले । देहातीत वस्तू ।। (समर्थ)

समर्थांच्या या उक्तीनुसार, विश्वातील सर्व साधुसंत हे देहातीत होऊन, आत्मस्वरूपाच्या, आत्मवस्तूच्या ठिकाणी एकरूप होऊन राहिलेल्या अवस्थेत असतात, असा श्रीदासराममहाराजांचा दृढभाव होता. त्यामुळेच आपल्या संप्रदायातील परंपरेमधील संत-सत्पुरूषांचेविषयी जशी त्यांचे ठिकाणी अतीव निष्ठा व जिव्हाळा वसत होता, तसेच अन्य संप्रदायातील/पंथातील व अन्य धर्मीय थोर विभूतींच्याविषयी त्यांच्या मनामध्ये अतीव आदर व प्रेमभाव होता. त्याचप्रमाणे अन्य संप्रदायिक/

अन्य पंथीय व अन्य धर्मीय साधुसंतांना देखील श्रीदासराममहाराजांचे विषयी अत्यंत आदर व प्रेमभाव होता.

श्रीदासराममहाराजांनी केलेल्या विविधप्रकारच्या लेखनामधून या त्यांच्या विश्वव्यापक दृष्टीचे प्रतिबिंब दिसून येते. प्रस्तुतच्या ग्रंथामधील त्यांनी लिहिलेले अभंग हे त्याचेच उदाहरण आहे. यामध्ये एकूण २६ अभंग व त्यावरील थोडक्यात विवेचन दिलेले आहे. या २६ अभंगांपैकी १५ अभंगांमधून चिमड संप्रदायाचे तत्त्वज्ञान व साधन साक्षात्कार यांचे वर्णन आलेले आहे. उर्वरीत ११ अभंग हे चिमड संप्रदायाव्यतिरिक्त अन्य संप्रदायिक/अन्य धर्मीय संत सत्पुरूषांच्या विषयीचे आहेत. या अभंगांचेमधून त्या त्या थोर विभूतींची ओळख अधोरेखित करणारी अशी त्यांच्या जीवनकार्याची वैशिष्ट्ये थोडक्यात व मोजक्या शब्दात सांगितली आहेत. अर्थात वर उल्लेख केलेल्या विषयाच्या विभागणीनुसार हे अभंग अनुक्रमाने आलेले नाहीत. वरील विषयाचे थोडक्यात अवलोकन खालीलप्रमाणे करता येईल :-

१) चिमड संप्रदायाचे तत्त्वज्ञान - साधन- साक्षात्कार (१५ अभंग):- या ग्रंथातील १५ अभंगांमधून चिमड संप्रदायाचे तत्त्वज्ञान - साधन व साक्षात्कार याविषयीचे वर्णन आलेले आहे.

अ) तत्त्वज्ञान :- देवाचे खरे स्वरूप कसे आहे हे सांगताना म्हटले आहे की, अत्यंत सूक्ष्त, विश्वाला व्यापून उरणारा चैतन्याचा वारा (चिद्वायू) हाच आत्मा असून, हाच खरा देव होय. हा चैतन्याचा वारा म्हणजे निश्चळ ब्रह्मापासून उत्पन्न झालेले स्फुरण असून, तोच नादप्रकाशयुक्त आत्मा होय. हा आत्माराम हाच जिवंतपणाचा आधार आहे. ही चैतन्यमात्रा देहात केशवरूपाने प्रवेश करताच, 'शव' असलेला देह सजीव होतो. असा हा चैतन्य आत्म्याचा सिद्धांत येथे प्रस्थापित केला आहे. (अभंग क्र.४, ६, ५, २४).

ब) साधनमार्ग :- चार देहाचा निरास झाला असता, देहभावाचा निरास होतो व खरे नाम हाताशी येऊन, निर्विकल्प समाधीच्या योगे

आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. हे होण्यासाठी प्रथम इडा-पिंगला सुषुम्नाकार होऊन, त्यामध्ये 'सोऽहं हंसः' या अक्षररूप अविनाशी गुरूमंत्राचे अहर्निश साधन साधले पाहिजे. असे साधन साधले असता, जीवन ऊर्ध्वगामी होऊन विश्वजाणीवेत प्रवेश करते. तेथे चित्ताचे चैतन्य होऊन, चैतन्याचे वारे प्रकाशरूपाने नयनात शिरते व त्यामुळे संपूर्ण विश्वाला व्यापून असणारा पारदर्शक भिंगाप्रमाणे असणाऱ्या चिद्प्रकाशाचा अनुभव येतो. अशातऱ्हेने आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. सारांशाने, चैतन्याच्या वाऱ्यावर नजर लागणे, चिदांगाचा ध्यास लागणे, हे साधनेतील वर्म आहे (अभंग क्र. ७, ८, ११, १२, १५, १९ व २५).

क) साक्षात्काराचा अनुभव :- साक्षात्काराचा स्वानुभव सांगताना श्रीदासराममहाराज म्हणतात की, सद्गुरू गुरुलिंगजंगममहाराजांच्या कृपेने मला चैतन्यरसाचा अनुभव आला. सहस्त्रदळातून पाझरून मुखी व पोटी स्त्रवणाऱ्या अमृतरसाचा स्वाद अवीट आहे (अभंग २२). श्वासोश्वासातील जीवनामध्ये नारायणाचे अस्तित्व असून, तळमळीने साधन साधले असता, चैतन्यरूप नारायणाचा निश्चित साक्षात्कार होतो असा निर्वाळा श्रीदासराममहाराजांनी दिला आहे (अभंग १८). आत्मतेजाचा उजेड नयनी सामावल्याने दासराम सर्वकाळी आत्मानंद भोगीत आहे (अभंग १०). अभंग क्र.२१ हा सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराज व प.पू.सद्गुरू श्रीगुरुलिंगजंगममहाराजांच्या विषयीचा आहे. समर्थ सद्गुरू श्रीगुरुलिंगजंगममहाराज यांचे कृपांकित, सद्गुरू श्रीहनुमंतराय कोटणीसमहाराजांनी हंसस्वरूप दाखविले असून हा दासराम त्यांचे पायी लीन आहे, असे या अभंगात म्हटले आहे.

**२)** अन्य संप्रदायिक/अन्य धर्मीय सत्पुरुषांचे विषयीचे अभंग (११):- या अभंग संग्रहामधील पहिले दोन अभंग हे श्रीरामकृष्ण परमहंस, विवेकानंद व भगिनी निवेदिता यांचे विषयीचे आहेत. श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या श्रीदासरामगाथेच्या प्रस्तावनेमध्ये प्रा. डॉ. के.वा.आपटे यांनी म्हटले आहे की, 'श्रीदासराममहाराजांना बंगालमधील सुप्रसिद्ध संत श्रीरामकृष्ण

परमहंस यांचे दर्शन झाले, त्याप्रसंगी श्रीदासराममहाराजांना स्फुरलेले/श्रुत झालेले अभंग म्हणजे हा संजीवनपाठ होय.’ त्यामुळे या दोन अभंगांना विशेष महत्व आहे. यामध्ये म्हटले आहे की, साक्षात् कालीमातेला प्रगट करणारे सोऽहंस्वरूप श्रीरामकृष्ण हे राम व कृष्णापेक्षा वेगळे नव्हते. तसेच विवेकाच्या आनंदात रमणारे, श्रीरामकृष्णांचे परमशिष्य श्रीविवेकानंद हे उच्चश्रेणीचे सत्पुरूष होते. श्रीरामकृष्ण परमहंस व भगिनी निवेदिता हे चैतन्यरूपाने एकरूप होते (अभंग क्र.१ व २).

समजीवनस्थितीत देहास सुटून संजीवन अवस्था प्राप्त होते. आपले पितृदेव श्रीमामामहाराजांना संजीवन समाधिस्थ झालेले प.पू.श्रीज्ञानेश्वरमहाराज भेटले असा उल्लेख, श्रीदासराममहाराजांनी अभंग क्र.२० मध्ये केलेला आहे. ‘माझा रंग तुझे गुणी’ म्हणणाऱ्या जनाबाईंचे गुरूप्रेम स्पष्ट होते, तसेच पिंडातील चार व ब्रह्मांडातील चार अशा आठ देहांचे निरसन करून, चित्ताचे चैतन्य होते हे श्रीएकनाथमहाराजांनी स्वतःच्या आचरणाने दाखविले आहे. बोलण्याप्रमाणे वागण्याचे महत्त्व संत श्रीतुकाराममहाराजांनी अनेकवेळा सांगितले आहे. म्हणूनच स्वतः देवरूप होऊन, मगच इतरांना उपदेश करणारे श्रीतुकाराममहाराजांना ‘जगद्‌गुरू संतश्रेष्ठ’ म्हटले जाते (अभंग क्र. ३,१३ व १७).

देहापासून अलिप्त होऊन, चैतन्याशी समरस होऊन चिन्मयपंथाने जाणारे, काळावरही मात करतात असे समर्थ सांगतात (अभंग क्र.९). स्वामी स्वरूपानंद, श्रीपाटीलमहाराजांचे गुरू श्रीरामानंदमहाराज खटावकर, श्रीब्रह्मचैतन्यमहाराजांचे शिष्य श्रीब्रह्मानंदमहाराज, श्रीनामानंद, स्वामी प्रणवानंद व ध्यानानंद अशा सिद्धसत्पुरूषांचे बोधाने खरे समाधान प्राप्त होते असे श्रीदासराममहाराज म्हणतात (अभंग क्र.१६). निजरूपाचे ठायी स्थित भगवान बुद्ध हे शांतीरूप असून, शांतीरूपाची प्राप्ती होताच प्रेम स्वरूपाचाही अनुभव येतो (अभंग २३). महावीरांचे ठायी उमटलेले दया, क्षमा हे दैवी गुण म्हणजे त्यांच्या वीरपणाच्या खुणा आहेत. तसेच शांतीसागर शंकराचार्यांनी सर्वांसाठी

अद्वैताचा झरा खुला केला असे अभंग क्र.२६ मध्ये म्हटले आहे. बुद्ध, पैगंबर, ख्रिस्त, झरतृष्ट्र, बसवेश्वर हे सर्व महात्मे परमात्मस्वरूप असून, त्यामुळेच त्यांना चैतन्यरूप परमामृताचा लाभ झाला (अभंग २४). अशाप्रकारे अनेक अभंगांमधून विश्वातील सर्व संतमहात्म्यांचा गुणगौरव करून श्रीदासराममहाराजांनी त्यांचेविषयीचा प्रेमभाव व्यक्त केला आहे.

श्रीदासराममहाराजांनी लिहिलेल्या या ग्रंथाची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील :–

१. यामध्ये चिमड संप्रदायाचे तत्त्वज्ञान – साधन – साक्षात्कार विषयक अभंग व त्यावरील विवेचन हे अत्यंत नेमकेपणाने व सूत्रमय भाषेत मांडले आहे.

२. चैतन्यात्मा हाच खरा देव असून, समजीवनाच्या अभ्यासाने ‘संजीवन’ अवस्थेची प्राप्ती होते. हीच चैतन्यात्म्याची ईश्वरीय अवस्था होय.

३. विश्वातील सर्व संतसत्पुरुष हे याच अध्यात्मातील एकात्म अशा देवरूप झालेल्या अवस्थेत असतात.

यातील अनेक अभंगांतून सर्व पंथीय साधुपुरूषांचे विषयी वाटणारा प्रेमभाव श्रीदासराममहाराजांनी व्यक्त केला आहे.

अशा या मौलिक ग्रंथाच्या वाचन, मननाने साधनमार्गाच्या आकलनाबरोबरच अध्यात्मामध्ये आवश्यक असणाऱ्या वैश्विक दृष्टीकोनाचे महत्त्व लक्षात येईल.

यापूर्वी श्रीदासराममहाराजांनी लिहिलेला हा ’श्रीदासरामश्रुत संजीवनपाठ’ हा ग्रंथ सन १९८७ रोजी प्रकाशित झाला होता. एकूण २६ अभंग व त्यावरील श्रीदासराममहाराजांचे विवेचन असलेला हा ग्रंथ श्री. विवेक हलदुले यांनी प्रकाशित केला होता. श्रीदासराममहाराजांनी या ग्रंथाची पार्श्वभूमी व आपले मनोगत सविस्तरपणाने मांडले आहे. यामध्ये श्रीदासराममहाराजांनी, त्यांना झालेले श्रीरामकृष्ण परमहंस यांचे दर्शन व त्यांना ऐकू आलेले २६ अभंग हा प्रसंग तपशीलाने सांगितला आहे.

तसेच चिमड संप्रदाय व श्रीरामकृष्णांचा ध्यान संप्रदाय एकरूप असल्याचे नमूद केले आहे.

आता या ग्रंथाचे पुनर्मुद्रण होत असून, त्यासाठी प्रस्तावना लिहिण्यास मला परमप्रिय श्री. दीपकनाना यांनी सांगितले आणि माझे सद्गुरू प.पू.श्रीदासराममहाराज यांची वाङ्मयीन सेवा करण्याचा लाभ मला मिळवून दिला, त्याबद्दल मी त्यांचा कृतज्ञ आहे. वास्तविक पाहता प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराजांचे तत्त्वज्ञान व त्यांच्या भव्य विभूतीमत्त्वाचे आकलन करून घेण्याची क्षमता, माझ्यासारख्या मंदबुद्धीच्या माणसाची नाही. तरीही माझ्याकडून जे लिहिले गेले, ते सर्व माझे सद्गुरू श्रीदासराममहाराजांची कृपा व प.पू.श्रीअण्णांचे अपार प्रेम याचेच हे फळ आहे.

अखेरीस भगवान सद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज, प.पू.सद्गुरू श्रीमामामहाराज तसेच माझे हृदयस्थ सद्गुरू प.पू. श्रीदासराममहाराज यांचे चरणी अनेक दंडवत घालतो व ही प्रस्तावना पूर्ण करतो.

श्रीदादांचा चरणरज
नारायण देशपांडे

# प्रथम आवृत्ती प्रकाशकाचे मनोगत

माझे सद्गुरू श्रीदासराममहाराज यांना श्रुत वा स्फुरलेला 'संजीवन पाठ' हा ग्रंथ साधकांचे हाती देताना मला आनंद होत आहे. या निमित्ताने सद्गुरूंच्या सेवेची संधी मला मिळाली, यात मला धन्यता वाटते. सद्गुरूंच्या कृपेनेच त्यांनी हे कार्य माझेकडून करवून घेतले. तसेच हा ग्रंथ माझे आई व वडील यांचे सद्गुरू श्रीवीरेश्वरानंदमहाराज यांच्या चरणी समर्पित होत आहे त्यामुळे आनंद द्विगुणीत होत आहे.

या पुस्तकाच्या पार्श्वभूमीमध्ये श्रीदासराममहाराज यांना श्रीरामकृष्णांनी दर्शन व आशीर्वाद दिले व तदनंतर त्यांना संजीवन पाठ श्रुत झाला वा स्फुरला याचे सविस्तर वर्णन आहे. त्यावरून मला असे वाटते की, श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा 'हरिपाठ' श्रीमामामहाराजांचा 'रामपाठ' व श्रीदासराममहाराजांचा 'संजीवनपाठ' हे एकाच तोडीचे ग्रंथ आहेत. यात माझी भूमिका केवळ 'मी तो हमाल भारवाही' अशीच आहे. पण असा अमोलिक माल लोकांचे हाती देताना एक सात्त्विक आनंद आहे.

हे पुस्तक प्रकाशित करताना मला माझे माता-पिता व भगिनी यांचे बहुमोल मार्गदर्शन व सहाय्य झाले. तसेच श्री. महाबळ यांनी अत्यंत आत्मियतेने व मेहनत घेऊन हे पुस्तक वेळेवर छापून दिले, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. हे पुस्तक छापताना, त्यांनी हे देवकार्य आहे असे मानून ते केले. तसेच या कामी मला विशेषतः श्रीचंद्रशेखर अण्णा, श्री. शरद खांडेकर व श्री. आरवाडे वगैरे अनेक लोकांचे सहाय्य झाले. त्यांचा मी आभारी आहे. सर्वांचीच नावे घालणे शक्य नाही.

सद्गुरूंच्या चरणी पुन्हा एकदा नमन करून हे मनोगत संपवितो.

**विवेक मुकुंद हलदुले**

# द्वितीय आवृत्ती प्रकाशकाचे मनोगत

संजीवन पाठ हा ग्रंथ यापूर्वी मी इ.स.१९८७ साली माझ्या वडिलांचे सद्गुरू स्वामी वीरेश्वरानंद यांच्या द्वितीय पुण्यतिनिमित्त प्रसिद्ध केला होता. सदर ग्रंथाच्या प्रती सध्या संपल्याने हा ग्रंथ पुर्नप्रकाशित करावा असे माझ्या मनात आले. त्यानुसार ही संजीवन पाठाची दुसरी आवृत्ती प्रकाशीत करीत आहे. नवीन पिढीतील वाचकांना, साधकांना या संजीवन पाठाचा निश्चित लाभ होईल असे मला वाटते.

**विवेक मुकुंद हलदुले**

# संपादकीय

परमार्थात समतेला महत्त्व आहे. समत्त्व आले की ममत्त्व नाहीसे होते. परमार्थात श्वासाला महत्त्व आहे. नामात पवन व पवनात नाम असे दोन श्वास जर साधले तर मन समधात होते. असे मन समधात झाले की, चित्ताला समत्त्व प्राप्त होते. याप्रमाणे आपले जीवनसुद्धा सम व्हायला हवे. असे झाले असता संजीवन स्थिती प्राप्त होते.

अशा संजीवन अवस्थेत प.पू. सद्गुरू श्रीदादांना हा 'संजीवनपाठ' श्रुत झालेला आहे. या संजीवनपाठाची पहिली आवृत्ती इ.स. १९८७ साली श्रीदादांचे कृपांकित श्री. विवेक मुकुंदराव हलदुले यांनी प्रकाशित केली. श्री. विवेक हलदुले यांचे वडील हे प.पू.स्वामी श्रीवीरेश्वरानंदजी यांचे अनुग्रहित आहेत. परंतु श्री. मुकुंदराव हलदुले यांची स्वामींप्रमाणेच प.पू.श्रीदादांचेवर अतीव निष्ठा व प्रेम आहे. स्वामी वीरेश्वरानंदजी हे स्वामी रामकृष्ण परमहंस यांच्या परंपरेतील होते. यांचा थोडक्यात जीवनपट प.पू.श्रीदादांनी वर्णन केला आहे.

प.पू.श्रीदादांच्या अंतःकरणात सांप्रदायिक भेदभाव नव्हता. ते कीर्तनात सांगायचे की, 'जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या भिंती जेव्हा कोसळून पडतात, तेव्हाच परमात्म्याचा खऱ्या अर्थाने साक्षात्कार होतो.' त्याप्रमाणे प.पू.श्रीदादांना श्रीरामकृष्ण परहंस यांनी हात वर करून आशीर्वाद देऊन दर्शन दिले आणि त्यानंतरच हा संजीवनपाठ श्रीदादांना श्रुत झाला. या संजीवन पाठात एकूण २६ अभंग असून यातील पहिले दोन अभंग हे त्यांचे कीर्तन सुरु असताना श्रुत झाले आहेत व उर्वरीत अभंग कीर्तन संपल्यावर एका बैठकीला श्रुत झाले आहेत. या अभंगाचे अवलोकन केले असता, रामकृष्ण परमहंस यांच्या बरोबरच, महावीर, गौतम बुद्ध, पैगंबर, ख्रिस्त, झरतृष्ट्र, बसवेश्वर इ. धर्मसंस्थापकांवरही अभंग श्रुत

झाले आहेत. याचे वैशिष्ट्य म्हणजे या अभंगांचे विवरणही त्यांनीच केले आहे. त्यामुळे त्या अभंगातील विषय समजायला सोपा झाला आहे.

असा संजीवनपाठ हा जसजसा पाठ होईल, तसतसा तो अनुभवाला येईल. या संजीवनपाठाची पहिली आवृत्ती संपली असल्याने दुसरी आवृत्ती प्रकाशीत करावी असा विचार मनामध्ये आला. याबाबत मी श्री. मुकुंदराव हलदुले यांचेशी फोनवरून संपर्क साधला. त्यांनीही आनंदाने दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतली. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

सदर ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याचे अवघड काम प.पू.श्रीदादांचे कृपांकित श्री. नारायणराव देशपांडे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण केले आहे. अक्षर जुळणीचे काम श्री. भालचंद्र सहस्त्रबुद्धे यांनी अत्यंत सुबकपणे केले आहे. कच्ची मुद्रिते तपासणेचे काम आमच्या श्रीअण्णांचे कृपांकित श्री. रमेशकाका लाळे यांनी अत्यंत शिताफीने केले आहे. यातील छायाचित्रे व मुखपृष्ठ सजावटीचे काम श्री. सागर मोहिते यांनी अत्यंत सुबकपणे केले आहे. तसेच या ग्रंथाचे छपाईचे काम मे. एस. बी. लिथो प्रेसचे मालक श्री. अमोल कुलकर्णी यांनी उत्कृष्ट केले आहे. या सर्वांचा मी आभारी आहे.

असा हा संजीवनपाठ साधकांना परमार्थाच्या वाटचालीत निश्चित उपयोगी पडेल असे मला वाटते.

दि.१५.१२.२०२०

देव दिवाळी

श्रीअण्णांचा कृपाभिलाषी

**दीपक चंद्रशेखर केळकर**

।। श्रीगुरुलिंगजंगम प्रसन्न ।।

।। श्रीरामकृष्ण प्रसन्न ।।

# प.पू.स्वामी श्रीवीरेश्वरानंदजी यांचा जीवनपट

स्वामी वीरेश्वरानंदमहाराज हे या लोकी ३१.१०.१८९२ रोजी गुरुपूर गावी कर्नाटकात अवतीर्ण झाले. त्यांचे आई-वडील हे अत्यंत धार्मिकवृत्तीचे आणि तसेच मोठे उदार होते. स्वामींच्या मातोश्रींचे नाव सौ. नेत्रावतीदेवी व तीर्थरूपांचे नांव श्रीकृष्णप्रभू असे होते. त्यांचे चिरंजीव पांडुरंगप्रभू हेच पुढे वीरेश्वरानंद म्हणून प्रसिद्ध झाले.

पांडुरंगप्रभू हे पाच वर्षांचे असताना आपले वडिलांचे समवेत जगद्‌विख्यात स्वामी विवेकानंद यांचे दर्शनास गेले होते. त्याचवेळी या बालकावर श्रीविवेकानंदानी मोठ्या प्रेमळ दृष्टीने कृपेचा वर्षाव केला.

पांडुरंगप्रभू पाच वर्षाचे असतानाच त्यांचे मातृछत्र हरपले व वयाच्या दहाव्या वर्षी पितृछत्रही हरपले. एवढ्या लहान वयातच त्यांचेवर हे घणाघाती दोन प्रचंड आघात झाले. एवढ्या वयातच विवेक जागृत झाल्याने त्यांनी हे दोन्ही आघात मोठ्या धारिष्ठ्याने पेलले असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.

श्रीपांडुरंगप्रभूंनी आपले शिक्षण त्यांचे मामांचेकडे केले. मामांनीच त्यांचा आईवडिलांप्रमाणे सांभाळ केला व आईवडिलांची उणीव भासू दिली नाही. १९१४ साली श्रीपांडुरंगप्रभू हे मद्रास विद्यापीठातून बी.ए.च्या परीक्षेत उत्तम यशस्वी झाले. पुढे कायद्याचे अभ्यासासाठी ते त्रिवेंद्रमला आले. शाळा महाविद्यालयातून क्रिकेट, टेनीस, फुटबॉल उत्तम खेळत असून, त्यांनी त्यातही चांगलाच लौकिक संपादन केला होता.

ईश्वरी संकेताने स्वामी विवेकानंदांचे समग्र ग्रंथापैकी एक ग्रंथ वाचनात आला. त्याचे मनन चिंतन होऊन पांडुरंगप्रभूंचे जीवन हे आरपार बदलूनच गेले. या अध्यात्म विचाराने जीवनात क्रांती होऊन ते अध्यात्म जीवन कसे जगता येईल याचा आपल्याशी शोध घेऊ लागले.

स्वामी विवेकानंदांचे सर्वच ग्रंथांचे अवलोकन करावे म्हणून त्यांनी मद्रास मठाशी संपर्क साधला. त्या ग्रंथांचे अवलोकन, मनन चिंतनपूर्वक झाल्याने त्यांना पुढे शिक्षणात रस वाटेना. श्रीपांडुरंगप्रभूंनी जीवसेवा हीच शिवसेवा हे

श्रीविवेकानंदांचे ध्येय आदर्श म्हणून आपल्यासमोर ठेवले आणि संपूर्णपणे शिक्षणास रामराम ठोकून ते रामकृष्ण मठाकडेच वळले आणि पुढे रामकृष्ण संस्थेस आपले सारे जीवन समर्पित केले.

१९१६ साली श्रीपांडुरंगप्रभूंना जगन्माता ज्यांना म्हणावे अशा श्रीशारदामातांचेकडूनच खुद्द दीक्षा मिळाली. केवढे भाग्य त्यांचे! यामुळे त्यांचे समग्र जीवनच उजळून निघाले. त्यांचे जीवन भव्य, दिव्य आणि उदात्त झाले. त्यांना श्रीशारदामातांचे कृपादृष्टीने मनःशांती लाभली आणि ते श्रीपांडुरंगप्रभूंचे श्रीवीरेश्वरानंद झाले.

श्रीवीरेश्वरानंदमहाराजांनी मद्रास, मायावती, वाराणसी, बेल्लूर वगैरे वेगवेगळ्या मठातून सहसचिव, सचिव, महासचिव, मठाध्यक्ष व अध्यक्ष अशा वेगवेगळ्या पदांवर आरूढ होऊन, अनेक उत्तम अशी कामे केली. सर्वांशी गोड बोलून, सर्वसमावेशक असे त्यांनी मोठे कार्य केले आणि सर्वांवर आपली छाप बसविली.

''बुडता हे जन न देखवे डोळा । म्हणोनि कळवळा येतो मज ।।'' या श्रीतुकाराममहाराज यांचे वचनाप्रमाणे गरीबांची दुःखे पाहून त्यांचे अंतःकरण हेलावून गेले. अनेक दुष्काळी परिस्थितीत वीरेश्वरानंदांनी रामकृष्ण मठातर्फे गरीबांची नुसती विचारपूस नव्हे, तर सक्रीय मदत केली. गोरगरीबांची सेवा तीही मनःपूर्वक केली. ते धन्य धन्य झाले आणि म्हणूनच २२ फेब्रुवारी, १९६६ साली त्यांची रामकृष्ण मठाचे अध्यक्ष म्हणून एकमुखाने निवड झाली आणि त्यांचे नांव सर्वतोमुखी झाले. या वेळेपासून दीक्षा देण्याचा संपूर्ण अधिकार श्रीवीरेश्वरानंदांना श्रीरामकृष्ण, शारदामाता आणि विवेकानंद यांचे पूर्णकृपेने प्राप्त झाला. त्यांनी भारतातील रामकृष्णांच्या सर्व मठांना भेटी दिल्या. ते मलेशिया वगैरे देशात गेले होते.

जीवसेवा म्हणजे दरिद्री नारायणाची सेवा, शिवभावाने करून चित्त शुद्ध केले तर ध्यान, धारणा, जप, अनुष्ठान या साऱ्या गोष्टी सुव्यवस्थित होतात अशा आशयाची त्यांची सहज सोप्या भाषेत श्रीरामकृष्णांचे किंवा भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचेप्रमाणे मोठी गोड शिकवण होती. माझे पितृदेव श्रीमामा केळकर हे आपले कीर्तनातून सारे विषय अगदी लहान मुलांना समजेल इतक्या सोप्या भाषेत सांगत. त्यामागे मोठी कळकळ होती, कळवळा होता.

त्यांचे कीर्तनात श्रीरामकृष्ण, विवेकानंद, शारदामाता, राणी रासमणी यांच्या सुलभ अध्यात्मपर गोष्टी वारंवार येत म्हणून तर आमचे घरी प.पू. श्रीभौमानंद किंवा पुण्याचे प्रति रामकृष्ण परमहंस – श्री. हरीबाबा दीक्षित – परमप्रिय श्री. बाबूराव गोखले यांचे व्याही आले होते. त्यांचे दर्शनाचा व प्रवचन श्रवणाचा लाभ आम्हाला श्रीमामांचे अद्वैत साम्राज्यात सहजच घडला. असो.

श्रीवीरेश्वरानंद यांनी शांकरभाष्य, श्रीमत् भगवद्गीतेवर टीका, धार्मिक जीवन असे अमोलिक ग्रंथ लिहिले असून, वयाची ६९ वर्षे रामकृष्ण मठाच्या सेवेतच समर्पित केली. संपूर्ण जीवनच रामकृष्ण सेवेला वाहिले होते.

आश्चर्य असे, स्वामी वीरेश्वरानंदजींनी आपले आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत विश्रांती अशी कधी खरी तर घेतलीच नाही. ‘आयुष्याच्या या साधने सच्चिदानंद पदवी घेणे’ या श्रीतुकोपनिषदाप्रमाणे आयुष्यच साधनीभूत करून ते सच्चिदानंदपदी आरूढ झाले. वीरेश्वरानंद हे पूर्ण ब्रह्म सच्चिदानंद झाले. ‘जयाचे पिसाट शब्द । सुखे म्हणो येती वेद ।। तरी मग सदेह सच्चिदानंद । का नोहावे ते ।।’ या श्रीज्ञानेश्वरमाऊलींचे उक्तीप्रमाणे त्यांनी अध्यात्माची शीग गाठली असेच म्हणावे लागेल.

वीरेश्वरानंदांना शेवटी कॅन्सरचे दुखणे झाले. त्यांचे गुरुबंधुंनी त्यांना हॉस्पिटलमध्ये ठेवावे असा विचार केला. पण त्यांनी या गोष्टीस स्पष्टपणे नकार दिला. ‘मी माझे सामान बांधून तयार आहे आणि आता गाडीची वाट पहात आहे. काय थोडे उपचार करावयाचे असतील तर ते या आश्रमातच करा.’ असे उद्गार काढले. म्हणून त्यांना आश्रमातच ठेवणेत आले.

१३ मार्च, १९८५ रोजी स्वामी वीरेश्वरानंदजी यांनी आश्रमातील सर्व देवतांना फुले पाठविली. सकाळी ९ वाजता ज्येष्ठ संन्याश्यांना बोलावून भक्तीकार्याबद्दल चर्चा केली. त्यांचेजवळ चांदीच्या डबीत श्रीमाताजींची चरण धूळ सतत ठेवलेली असे. दुपारी १ वाजून ४५ मिनिटांनी स्वामीजींनी गंगाजळाने हात धुतले आणि ती डबी काढली व एका संन्याशाचे हाती सुपूर्त केली. स्वामींचे छातीत दुपारी २.३० वाजता दुखू लागले म्हणून त्यांना औषध घेणेविषयी आग्रहाची विनंती केली. परंतु ज्यांनी ही विनंती केली, त्याला स्वामींनी शेवटी नकारच दिला. यानंतर स्वामींनी उठून बसविणेची आपली इच्छा प्रदर्शित केली. बसल्यानंतर पवित्र गंगाजलाचे मार्जन आणि प्राशन केले. त्याचप्रमाणे

श्रीरामकृष्णांचे चरणामृत घेतले. श्रीरामकृष्ण, माताजी व स्वामी विवेकानंदांचे स्मरण करून प्रणिपात केला. तीनवेळा दीर्घ श्वास घेतला आणि आपला देह ठेवला. भगवान श्रीरामकृष्ण परमहंस यांचे स्वरूपात मिळून श्रीवीरेश्वरानंद हे परमहंस स्वरूप झाले. त्यावेळी दुपारी ३.१७ मि. झाली होती. 'कां झाकिलिया घटीचा दिवा । काय झाला नकळे केव्हा । या परि जो पांडवा । देह ठेवी ।।' अशा श्रीज्ञानेशोक्तीप्रमाणे स्वामीजी स्वरूपाकार झाले.

९३ वर्षांपूर्वी श्रीवीरेश्वरानंद यांनी याचवेळी जन्म घेतला होता, वारही बुधवार होता. याच दिवशी श्रीरामकृष्ण हे अवतीर्ण झाले होते. वीरेश्वरानंदांनी आपल्या हयातीत ७५ हजारांच्याही वर मुमुक्षूंना अनुग्रह दिला व अध्यात्ममार्गास प्रवृत्त केले. यांचेकडून अनुग्रह मिळण्याचे भाग्य आमचे परमप्रिय श्री. हलदुले यांना लाभले हे सांगण्यात मला आनंद होतो.

या वेळेपासून दीक्षा देण्याचा संपूर्ण अधिकार वीरेश्वरानंदांना श्रीरामकृष्ण, श्रीशारदामाता आणि विवेकानंद यांचे पूर्णकृपेने प्राप्त झाला. त्यांनी भारतातील श्रीरामकृष्णांच्या सर्व मठांना भेटी दिल्या आणि त्यांचे कार्यात मौलिक मार्गदर्शन करून ते अमोलिक ठरले. ते नेपाळ, सिंगापूर, मलेशिया वगैरे देशात गेले होते.

जीवसेवा म्हणजे दरिद्री नारायणाची सेवा, शिवभावाने करून चित्त शुद्ध केले तर ध्यान, धारणा, जप, अनुष्ठान या साऱ्या गोष्टी सुव्यवस्थित होतात अशा आशयाची त्यांची सहज सोप्या भाषेत श्रीरामकृष्णांचे किंवा भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचेप्रमाणे मोठी गोड शिकवण होती. माझे पितृदेव श्रीमामा केळकर हे आपले कीर्तनातून सारे विषय अगदी लहान मुलांना समजेल इतक्या सोप्या भाषेत सांगत. त्यामागे मोठी कळकळ होती, कळवळा होता. त्यांचे कीर्तनात श्रीरामकृष्ण, विवेकानंद, शारदामाता, राणी रासमणी यांच्या सुलभ अध्यात्मपर गोष्टी वारंवार येत म्हणून तर आमचे घरी प.पू. श्रीभौमानंद किंवा पुण्याचे प्रति रामकृष्ण परमहंस – श्री. हरीबाबा दीक्षित – परमप्रिय श्री. बाबूराव गोखले यांचे व्याही आले होते. त्यांचे दर्शनाचा व प्रवचन श्रवणाचा लाभ आम्हाला श्रीमामांचे अद्वैत साम्राज्यात सहजच घडला. असो.

श्रीवीरेश्वरानंद यांनी शांकरभाष्य, श्रीमत् भगवद्गीतेवर टीका, धार्मिक जीवन असे अमोलिक ग्रंथ लिहिले असून वयाची ६९ वर्षे रामकृष्ण मठाच्या

सेवेतच समर्पित केली. संपूर्ण जीवनच रामकृष्ण सेवेला वाहिले होते.

आश्चर्य असे, स्वामी वीरेश्वरानंदजींनी आपले आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत विश्रांती अशी कधी खरी तर घेतलीच नाही. 'आयुष्याच्या या साधने सच्चिदानंद पदवी घेणे' या श्रीतुकोपनिषदाप्रमाणे आयुष्यच साधनीभूत करून ते सच्चिदानंदपदी आरूढ झाले. वीरेश्वरानंद हे पूर्ण ब्रह्म सच्चिदानंद झाले. 'जयाचे पिसाट शब्द । सुखे म्हणो येती वेद ।। तरी मग सदेह सच्चिदानंद । का नोहावे ते ।।' या श्रीज्ञानेश्वरमाऊलींचे उक्तीप्रमाणे त्यांनी अध्यात्माची शीग गाठली असेच म्हणावे लागेल.

वीरेश्वरानंदांना शेवटी कॅन्सरचे दुखणे झाले. त्यांचे गुरुबंधुंनी त्यांना हॉस्पिटलमध्ये ठेवावे असा विचार केला. पण त्यांनी या गोष्टीस स्पष्टपणे नकार दिला. 'मी माझे सामान बांधून तयार आहे, आणि आता गाडीची वाट पहात आहे. काय थोडे उपचार करावयाचे असतील तर ते या आश्रमातच करा.' असे उद्गार काढले. म्हणून त्यांना आश्रमातच ठेवणेत आले.

१३ मार्च, १९८५ रोजी स्वामी वीरेश्वरानंदजी यांनी आश्रमातील सर्व देवतांना फुले पाठविली. सकाळी ९ वाजता ज्येष्ठ संन्याश्यांना बोलावून भक्तीकार्याबद्दल चर्चा केली. त्यांचेजवळ चांदीच्या डबीत श्रीमाताजींची चरण धूळ सतत ठेवलेली असे. दुपारी १ वाजून ४५ मिनिटांनी स्वामीजींनी गंगाजळाने हात धुतले आणि ती डबी काढली व एका सन्याशाचे हाती सुपूर्त केली. स्वामींचे छातीत दुपारी २.३० वाजता दुखू लागले म्हणून त्यांना औषध घेणेविषयी आग्रहाची विनंती केली. परंतु ज्यांनी ही विनंती केली त्याला स्वामींनी शेवटी नकारच दिला. यानंतर स्वामींनी उठून बसविणेची आपली इच्छा प्रदर्शित केली. बसल्यानंतर पवित्र गंगाजलाचे मार्जन आणि प्राशन केले. त्याचप्रमाणे श्रीरामकृष्णांचे चरणामृत घेतले. श्रीरामकृष्ण, माताजी व स्वामी विवेकानंदांचे स्मरण करून प्रणिपात केला. तीनवेळा दीर्घ श्वास घेतला आणि आपला देह ठेवला. भगवान श्रीरामकृष्ण परमहंस यांचे स्वरूपात मिळून श्रीवीरेश्वरानंद हे परमहंस स्वरूप झाले. त्यावेळी दुपारी ३.१७ मि. झाली होती. 'कां झाकिलिया घटीचा दिवा । काय झाला नकळे केव्हा । या परि जो पांडवा । देह ठेवी ।।' अशा श्रीज्ञानेशोक्तीप्रमाणे स्वामीजी स्वरूपाकार झाले.

९३ वर्षांपूर्वी श्रीवीरेश्वरानंद यांनी याचवेळी जन्म घेतला होता, वारही

बुधवार होता. याच दिवशी श्रीरामकृष्ण हे अवतीर्ण झाले होते. वीरेश्वरानंदांनी आपल्या हयातीत ७५ हजारांच्याही वर मुमुक्षूंना अनुग्रह दिला व अध्यात्ममार्गास प्रवृत्त केले. यांचेकडून अनुग्रह मिळण्याचे भाग्य आमचे परमप्रिय श्री. हलदुले यांना लाभले हे सांगण्यात मला आनंद होतो. इष्ट देवता श्रीसद्गुरु रामकृष्णच होत, मी फक्त त्यांचा प्रतिनिधी म्हणून दीक्षा देतो. रामकृष्ण हेच एक श्रेष्ठ गुरुपद आहे. आपण सर्वांचे तेच एकमेव गुरु आहेत असे श्रीवीरेश्वरानंद सांगत असत. त्यांचे जीवन श्रीरामकृष्णमय झाले होते. ते त्या रामकृष्ण रूपातच फाल्गुन वद्य सप्तमीस दि.१३.०३.१९८५ रोजी विलीन झाले. अशा महापुरुषाची थोरवी कोणत्या शब्दात वर्णन करता येईल असा प्रश्न आहे. त्यांचे पवित्र चरणी आमचे शतशः विनम्र अभिवादन!

***दासराम***

# पार्श्वभूमी

श्रीक्षेत्र चिमड येथे स्वामी विवेकानंद हे श्रीसाधुमहाराज यांचे दर्शनास येऊन गेल्याचे पूर्वी ऐकिवात होते. या योगाने भगवान श्रीरामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, श्रीरामतीर्थ यांचे समग्र ग्रंथ माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांचे वाचनात होते. श्रीमामांचा बराचकाळ या सद्ग्रंथांचे मननात आणि चिंतनात गेला होता. त्यामुळे श्रीमामांचे अखंड कीर्तनात वारंवार श्रीरामकृष्ण आणि विवेकानंद हे येत असत. ते श्रवण करताना श्रीरामकृष्ण, विवेकानंद आणि रामतीर्थ हे मुमुक्षू साधकांचेसमोर उभे रहात आणि मग त्या कीर्तन श्रवणाचा आनंद काही वेगळाच असे. त्या कीर्तन पर्वकाली श्रीमामांना वरील निर्दिष्ट त्रयमूर्तींचे दर्शन निश्चित प्राप्त झाले असले पाहिजे असे श्रोतृवृंदास वाटल्यावाचून राहिले नाही. श्रोत्यांची श्रवणपुटे भरून प्रेमाश्रु नेत्रातून अक्षरशः ओघळत असत. श्रीदत्तोपंत लिमये, श्री. मनोहर व श्री. वासुदेवराव अभ्यंकर इत्यादी मंडळींनी मजजवळ तसे मामांचेबद्दल बोलत असताना उद्गार काढल्याचे मला स्मरते.

भगवान रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद व रामतीर्थ यांचे उल्लेख श्रीमामा इ.स. १९६२ मध्ये सोमवार, माघ शुद्ध नवमीस स्वरूपाकार झाल्यानंतरही पुढे जो कीर्तनाचा ओघ आमचे श्रीरामनिकेतन येथे चालू आहे, त्या कीर्तनात वारंवार येत असतो. बुधवार दि.१२.०३.१९८६ रोजी आमचे श्रीरामनिकेतनात सांगली येथे भगवान रामकृष्णांची जन्मशताब्दी साहजिकपणेच मोठ्या थाटाने साजरी झाली.

सकाळी ८ वाजता श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या प्रतिमेचे पूजन, परमप्रिय श्री. हलदुले यांचे हस्ते झाले. श्री. हलदुले हे, पूजनीय माताजींचे शिष्य, प.पू. श्रीविरेश्वरानंद मोठे अधिकारी पुरूष जे नुकतेच रामकृष्ण स्वरूप झाले, त्यांचे प्रिय शिष्य आहेत. ते आमचे घरी श्रीरामनिकेतनात वारंवार कीर्तनास येत असून, त्यांना येथे फार मोठे समाधान मिळते. त्यांची आमचेवर मोठी श्रद्धा असून, ते आपला काळ आपल्या वाट्यास

आलेला व्यवसाय सांभाळून, श्रीरामकृष्णांचे चिंतनात घालवितात. यादृष्टीने श्री. हलदुले यांचे हस्ते श्रीरामकृष्णांचे प्रतिमेचे पूजन झाल्यानंतर, भगवान श्रीरामकृष्ण यांचे चरित्रातील काही उद्‌बोधक भाग श्री. हलदुले यांनी वाचला. पुढे आरती, नामाचा समास, श्रीतुकाराममहाराज यांचे १२ अभंग झाले आणि जे भाविक भक्त त्यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते, त्या सर्वांना तांदळाच्या खिरीचा प्रसाद दिला. भगवान रामकृष्णांना तांदळाची खीर आवडत असे. हे मला प.पू. विद्यावाचस्पती श्रीविष्णुजी क्षीरसागर, नाशिक यांचेकडून आधीच समजले होते. श्रीविष्णुजी सांगलीला आले की आमचेकडे येऊन जातात. तीं. ताई बापट यांचेकडे त्यांचा मुक्काम असतो. गतवर्षीचे भेटीत त्यांनी मला श्रीरामकृष्णांचा एक दुर्मिळ फोटो दिला असून तो आम्ही जपून ठेवला आहे. त्यावेळीच श्रीरामकृष्णांच्या जन्मशताब्दीचा विषय ओघानेच आला होता.

सकाळचा हा कार्यक्रम वर सांगितल्याप्रमाणे झाल्यावर सायंकाळी ५ ते ६.३० ध्यान धारणा होऊन परमप्रिय श्रीकांत देशपांडे यांचे गंगेच्या ओघाप्रमाणे अगदी उत्कृष्ट असे श्रीरामकृष्ण परमहंस व श्रीमामा यांचे चरित्र व तत्त्वज्ञान यावर प्रवचन झाले. या भक्तिप्रेमात सारे श्रोते न्हाऊन निघाले, डुंबलेच डुंबले! तो आनंद गगनात मावेना असे झाले. आजही त्या प्रवचनाची मला आठवण होते. नंतर नित्याचे कीर्तन, श्रीमामांचा रामपाठ व नित्याप्रमाणे चिमडची पंचपदी होऊन भगवान रामकृष्ण परमहंस यांचे जन्मशताब्दीची सांगता झाली. कीर्तनातही सर्वांना प्रसाद दिला होता. तात्पर्य, हा सर्व सोहळा आमचे श्रीमामांना आनंद व्हावा अशा पद्धतीने मोठ्या थाटात संपन्न झाला.

इतके विस्ताराने हा सर्व विषय येथे सांगणेचे काही कारण आहे. या योगे रामकृष्णांचा एक ध्यासच मला लागला. चिंतनात, बोलण्यात सारखा तोच विषय येऊ लागला. भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज व भगवान श्रीरामकृष्ण परमहंस हे दोघे एकरूप आहेत अशी खात्री झाली.

आमचे श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी आमचा चिमड सांप्रदाय आणि रामकृष्णांचा हा ध्यान सांप्रदाय एकरूप आहे हे स्पष्ट केले.

रविवार दि.०४.०५.१९८६ रोजी आमचेकडे नित्य कीर्तनास येणाऱ्या, श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे कृपेतील सौ. श्यामला कृष्णराव पटवर्धन यांचेजवळ अध्यात्मचर्चा चालू असतानाच सहजपणे श्रीरामकृष्ण, विवेकानंद आणि भगिनी निवेदिता यांचा हृदयस्पर्शी असा विषय निघाला आणि त्यानंतर आश्चर्य असे, मजसमोर सारखे रामकृष्णच उभे राहिले. भगवान रामकृष्ण परमहंस उभे आहेत आणि त्यांनी दोन्ही हात वर केले आहेत, जणू ते आशीर्वाद देत आहे, असेच ते दृश्य होते आणि त्या अवस्थेत मला श्रीरामकृष्णांचेवर अभंग स्फुरू लागले. कीर्तनाची तर वेळ झालेली, कीर्तनातच चि. यशवंत आपटे यास काही सांगत होतो. तो लिहित होता. असे एक-दोन अभंग झाले. कीर्तनात आतून तीच एक धून होती आणि कीर्तन, रामपाठ, पंचपदी झाल्यावर एका बैठकीलाच पुढे १८ अभंग लिहून झाले. खाणे-पिणे हे भानच नव्हते. आतून एक आनंद होत होता. ते हे २६ अभंग आहेत. हे जे अभंग मला स्फुरले किंवा ऐकू आले, त्याची पावतीच रामकृष्णांनी दिली याची ही मौज वाटते. असे काही जर ऐकू आले किंवा स्फुरले तर त्याच्या २-३ प्रती हस्तलिखित करून ठेवायच्या अशी माझी एक पद्धत असल्याने, यातील अभंगांच्या तीन प्रती लिहून तयार केल्या. आणि आश्चर्य, शनिवार दिनांक १०.०५.१९८६ रोजी सकाळी १० वाजणेचे सुमारास श्रीरामकृष्ण परमहंस मठ, दिल्ली येथील अधिकारी पुरूष श्रीनिरंजनानंद हे परमप्रिय श्री. रामभाऊ चिपळूणकर यांचेबरोबर आले होते. या घटनेने मला काय वाटले हे सांगणेच कठीण. मन भारावून गेले आणि म्हटले, 'साधू गृहाप्रती आले । भले सार्थक झाले ।।' नंतर स्वामींनी रामकृष्णांना प्रिय असलेले एक बंगाली पद म्हटले आणि त्यांनी आमचे श्रीमामांना जे १९०४ साली श्रीज्ञानेश्वर माऊलींचे दर्शन झाले, त्या छायाचित्राचे दर्शन घेण्याची उत्सुकता व्यक्त

केली. त्यांना ते छायाचित्र दाखविताच, अश्रुपूर्ण नयनांनी त्यांनी श्रीज्ञानेश्वर माऊलींचे दर्शन घेतले व दिल्ली येथील त्यांचे म्युझियममध्ये प्रतिष्ठित करणेसाठी त्यांनी एकादी प्रत मागविली. ती त्यांना दिली. श्रीनिरंजनानंदांना श्रीरामकृष्णांचे बद्दल मला जे काही ऐकू आले, ते सांगितले. वाचून दाखविले. त्यांना ते विशेष वाटले. सौ. सीतावहिनी या महान साध्वी होत्या असे उद्‌गार त्यांचे छायाचित्राकडे पाहून स्वामींनी काढले व त्यांची काही हकिगत हिंदीतून लिहून पाठवा, आम्ही आमचे मासिकात देऊ असेही ते म्हणाले. मागे पुण्याहून प.पू. श्रीभौमानंद हे अधिकारी पुरुषही आमचे येथे आले होते. त्यांनी नित्याचे कीर्तनानंतर थोडे प्रवचन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले होते. श्री. हलदुले यांनी त्यांचेकडे हे २६ अभंग पाठविले, त्यांनी ते नागपूर येथे श्रीरामकृष्ण परमहंस यांचे मठात, तेथील अधिकारी पुरूष स्वामी व्योमरुपानंदजी यांचेकडे पाठविले. त्यांनी त्यातील चार निवडक अभंग, 'संजीवनपाठ' या शीर्षकाखाली जीवन विकास या मासिकात प्रसिद्ध केले. हा सर्व विषय पाहता, श्रीरामकृष्णांनी कशी पावती दिली हे दिसून येईल.

श्री. हलदुले यांचे सद्गुरू स्वामी वीरेश्वरानंद यांची द्वितीय पुण्यतिथी फाल्गुन वद्य सप्तमीस १९८७ साली येत आहे. त्यांना या अभंगातील विवेचन समर्पण करावे यादृष्टीने श्री. हलदुले यांनी मला सांगितलेप्रमाणे या अभंगांचे विवेचन थोडक्यात पण पाल्हाळ न लावता करावे असा विचार आहे, म्हणून यापुढे आपण आता संजीवन पाठातील जो विषय यथाक्रम आला आहे, तो यथाक्रम पाहू.

**राम गोविंद केळकर (दासराम)**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ✻ | प्रस्तावना ... ... ... ... | एक |
| ✻ | प्रथम आवृत्ती प्रकाशकाचे मनोगत ... ... | सात |
| ✻ | द्वितीय आवृत्ती प्रकाशकाचे मनोगत ... ... | आठ |
| ✻ | संपादकीय ... ... ... ... | नऊ |
| ✻ | प.पू.स्वामी वीरेश्वरानंदजी यांचा जीवनपट ... ... | अकरा |
| ✻ | पार्श्वभूमी... ... ... ... ... | सतरा |


## अभंगांचे विवरण


| | | |
|---|---|---|
| १. | कृष्ण तोचि राम राम तोचि कृष्ण ... ... | ०१ |
| २. | चैतन्य चैतन्या पडे जरी खेव ... ... | ०६ |
| ३. | श्यामल रुपडे ... ... ... ... | ०९ |
| ४. | होती हातवारे ... ... ... ... | १२ |
| ५. | ज्यात काही हालचाल ... ... ... | १४ |
| ६. | श्यामलांग तुझे ऐसी आठवण ... ... ... | १६ |
| ७. | पहाता हे सर्वांग ... ... ... ... | १८ |
| ८. | वारे शिरले नयनात ... ... ... ... | २० |
| ९. | महाथोर तरी मृत्युपंथे गेले ... ... ... | २२ |
| १०. | आजी हा उजेड आला माझे नयनी ... ... | २६ |
| ११. | सावल्यांचा खेळ सावल्या खेळती... ... ... | २७ |
| १२. | चतुराक्षरी हा असे गुरूमंत्र ... ... ... | ३२ |
| १३. | करुनी दावी तरी ... ... ... ... | ३३ |
| १४. | काना मात्रा असे ... ... ... ... | ३५ |
| १५. | खरे बोले तरी ... ... ... ... | ३६ |
| १६. | स्वरुपानंद रामानंद ... ... ... ... | ३७ |
| १७. | रुप बैसे दृष्टी ... ... ... ... | ३८ |
| १८. | श्वासोश्वासामाजी पाहतसे वाट ... ... ... | ३९ |
| १९. | सोडलेची नाही तरी घेसी काई... ... ... | ४० |
| २०. | समजीवन हे असे संजीवन ... ... ... | ४१ |
| २१. | राजहंसालागी मोतियाचा चारा ... ... ... | ४३ |
| २२. | अमृताचा स्वाद मजला मिळाला ... ... | ४५ |
| २३. | आज तरी असे बुद्धाची जयंती... ... ... | ४६ |
| २४. | माझा जो ईश्वर बुद्ध पैगंबर ... ... ... | ४७ |
| २५. | पहाता खनाळ नुरे खळखळ ... ... ... | ४८ |
| २६. | महावीर तेथे आला वीरपणा ... ... ... | ४९ |

# श्रीरामकृष्ण आरती

।। ॐ नमो भगवते रामकृष्णाय ।।

खंडन भव-बंधन, जगवंदन, वंदि तोमाय ।
निरंजन नररूप, निर्गुण गुणमय ।।१।।
मोचन-अघदूषण, जगभूषण चिद्घनकाय ।
ज्ञानांजन-विमल-नयन, वीक्षणे मोह जाय ।।२।।
भास्वर भावसागर, चिर-उन्मद प्रेम-पाथार ।
भक्तार्जन-युगुल-चरण तारण भव-पार ।।३।।
जृम्भित-युग ईश्वर, जगदीश्वर योगसहाय ।
निरोधन, समित-मन, निरखि तव कृपाय ।।४।।
भंजन-दुःखघ्नजन शरणयात्रा मडकठोर ।
प्राणार्पण जगत-तळा कृष्णा कलिदोर ।।५।।
वांचना-कामकाचन अतिनिंदित-इंद्रिय-राग ।
त्यागीश्वर हे नरवर देह पदे अनुराग ।।६।।
निर्भय गतसंशय दृढनिश्चय-मानसवान ।
निष्कारण-भकत शरण त्यजि जातिकुलमान ।।७।।
संपदित तव श्रीपाद भव-गोष्पद-वारि यथाय ।
प्रेमरचना समदरशन जगजन-दुःख जाय ।।८।।
नमो नमो प्रभू वाक्य-मनातीत मनोवचनैकाधार ।
ज्योतिर ज्योति उजल हृदिकंदर तुमी तमोभंजनहार ।।९।।
धे धे धे लंग रंग भंग बाजे अंग सह मृदंग ।
गाईछे छंद भकतवृंद आरती तोमारा ।
जय जय आरती तोमार हर हर आरती तोमारा ।
शिव शिव आरती तोमार जय प्रभू आरती तोमारा ।।१०।।

।। जय श्रीगुरुमहाराजजी की जय ।।

।। जय महामायी की जय ।।

## अभंग १

कृष्ण तोचि राम राम तोचि कृष्ण । तेचि रामकृष्ण ओळखावे ।।१।।
रामकृष्ण जरी हंसस्थिती आले । परमहंस झाले रामकृष्ण ।।२।।
ऐसे स्वामी रामकृष्ण परमहंस । जडले मानस तये ठायी ।।३।।
काली माता प्रगट रामकृष्णे केली । भलीच माऊली रामकृष्ण ।।४।।
विवेक आनंद ते विवेकानंद । लाभे सिद्धानंद *दासरामा* ।।५।।

या अभंगात भगवान रामकृष्ण परमहंस यांची ओळख ही महत्वपूर्ण आहे. ॐ या संकेताने चित्तात लख्ख प्रकाश पडला तर तीच खरी चैतन्याची ओळख आहे. ती जेथे नाही, तेथे अनोळख असल्याने X.Y.Z वर उथळपणे व्यवहार चालतो. तेथे परमार्थाची भाषाच नाही, मग परमार्थ तर राहोच. 'ॐ तत् सत् ऐसे । हे बोलणे जेथ नेतसे । जेथूनी हे प्रकाशे । विश्वजात ।।' ही श्रीज्ञानेश्वर माऊलींची ओवी मोठी चिंतनीय आहे. 'ॐ इत्येकाक्षरम् ब्रह्मं' अशी श्रुती आहे. तर 'म्हणोनि प्रणवैकनाम । हे एकाक्षर ब्रह्म। माझे स्वरूप परम । स्मरतसांता ।।१।। या परी त्यजी जो देहाते । तो त्रिशुद्धी पावे माते । जया पावण्या परौते । आणिक पावणे नाही ।।२।।' या दोन माऊलींच्या ओव्या सतत उरी बाळगाव्या इतक्या त्या अमोलिक आहेत. ॐ हे तत्त्व मोठे स्फुरद्रुप, स्वयंचलित, स्वयंपूर्ण, स्वसंवेद्य आणि स्वयंसिद्ध आहे. तेथे आपण कटिबद्ध होऊन त्याचे सतत सेवेला सदा सिद्ध राहिलो तर, ती प्रचिती काही आगळीच आहे. त्यात नाद आहे आणि प्रकाश आहे. ते तत्त्व सर्वगत, सर्वव्याप्त आणि सर्वस्थित आहे. त्यातच सर्वकाही स्थित आहे. हे आपण व्यवस्थित जाणले पाहिजे. यासाठी तेथे आपण सतत सामोरे जाऊन उपस्थित असणे हे आवश्यक आहे.

कृष्ण आणि राम म्हणजेच रामकृष्ण ही जोडी अढळपणे या विश्वात सततपणे साक्षात्कारी आहे. म्हणजे 'सातवा अवतार आठवा वेळोवेळा । बापरखुमादेवीवरा विठ्ठलू जवळा ।।' असे श्रीज्ञानोबाराय आपल्या अभंगात प्रगटपणे सांगतात. सातवा आणि आठवा अवतार म्हणजेच रामकृष्ण. हे वेळोवेळा म्हणजे वेळेत आणि अवेळेत जर आठवले तर परमात्मा पांडुरंग आपल्या जवळच आहे, असे दर्शवून देतात. रामकृष्ण या मूर्ती आहेत. रामकृष्ण ही नामे सर्वश्रेष्ठ आहेत. रामकृष्ण हेच स्वरूप बरवे असे आहे. रामकृष्ण नामातच उन्मनी साधते. रामकृष्ण वाचा हा जीवाचा भाव आहे म्हणून तोच आपला स्वभाव होणे अगत्याचे आहे. रामकृष्णी वाचा हेच एक मोठे तप आहे. रामकृष्ण हीच एक जपमाला आहे. असे अनेक प्रकाराने रामकृष्ण हे महनीय आहेत. 'रामकृष्ण मूर्ती या जपा आवृत्ती । नित्य नामे तृप्ती झाली आम्हा ।।१।।' असे श्रीनिवृत्तीनाथ म्हणतात. रामकृष्ण गतींची अखंड होणारी फेरी हीच ती आवृत्ती आहे. तेथे वृत्ती रमली तर त्या नित्यनामातच तृप्ती आहे. यात जीवनाचा रस असल्याने त्याचा रसास्वाद संत घेतात. 'रामकृष्णी रसरसना रंगेली । अमृताची वल्ली नाम तुझे ।।' हे श्रीतुकोपनिषद चिंतनीय असून, आमचे भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे रामकृष्णी रसाचे विवेचन आपले कीर्तनात करू लागले की, ब्रह्मरस ओसंडू लागे. इतके या रामकृष्णी रसाचे श्रेष्ठत्व आहे. 'रामकृष्ण नामे ये दोनी साजिरी । हृदयमंदिरी स्मरे का रे ।।' या अभंगात श्रीज्ञानेश्वरमहाराज रामकृष्ण नामे ही सहा विकारांना जिरविणारी असून त्यांचे स्मरण हृदयात होत असल्याचे निर्दीष्ट करतात, 'राम बरवा कृष्ण बरवा । सुंदर बरवा बाई येवो ।।' या अभंगात माऊलीने या रामकृष्णांचे बरवेपण सांगितले आहे. 'रामकृष्ण नामी उन्मनी साधिली ।' हा माऊलीचा हरिपाठ चरण प्रसिद्ध आहे. 'रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा ।' हा हरिपाठ चरण रामकृष्ण वाचा हा जीवाचा भाव आहे हे ठोसपणे स्पष्ट करतो. 'रामकृष्णी वाचा अनंत राशी तप ।'

या हरिपाठातील चरणात हेच एक मोठे तप असल्याचे प्रस्तुत करून, तप या शब्दाने त्यात प्रकाशच प्रकाशित आहे. 'ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण माळा । हृदयी उमाळा श्रीमूर्ती त्या ।।' यात माळ कोणती ते दाखवून दिले आहे. 'ज्ञानदेवा ध्यानी रामकृष्ण मनी । अनंत जन्मोनी पुण्य होय ।।' या हरिपाठ वचनात ध्यानामनाचा विषय रामकृष्ण होणे यापरते पुण्य नाही, याचा सहजच उकल झालेला आहे.

तात्पर्य, 'कृष्ण तोच राम आणि राम तोच कृष्ण' हे जाणले तर रामकृष्ण आपल्या समोर उभेच आहेत हे निश्चित. भगवान रामकृष्ण नरेंद्राना म्हणजे स्वामी विवेकानंदांना वारंवार सांगत, पण विवेकानंद हे मोठे बुद्धीवादी असल्याने, या वचनाची त्यांनी तशी पकड घेतली नव्हती. हे सांगतात हे खरेच आहे का? असे त्यांचे मनात येई. रामकृष्ण हे विवेकानंदांचे गुरू, किंबहुना तेच त्यांचे देव. तरीपण .... हेच खरे का? असे मनात चाटून जाईच. रामकृष्णांचे आयुष्यातील अगदी शेवटचा क्षण आला तरी हे विवेकानंद साशंकच होते. त्यांनी मनात आणले की, आता यावेळी जर स्वामी पुन्हा 'राम तोच कृष्ण आहे व तोच रामकृष्ण आहे' असे उद्गार काढतील तर मात्र, हे खरेच 'रामकृष्ण' आहेत. मग त्यांचेच कार्य जीवापाड करणे हे आपले काम आहे. ते आपण निश्चितच करू. आणि आश्चर्य, भगवान म्हणाले, 'अरे नरेंद्र, जो राम आहे, तोच कृष्ण आहे, जो कृष्ण आहे तोच राम आहे आणि असा रामकृष्ण तुझ्या समोर आहे. अजून तू संशय घेतोस. मला ओळखत नाहीस.' त्यावेळी श्रीविवेकानंदांनी साश्रुनयन भगवानांचे पवित्र चरण मस्तकी घट्ट धरले. म्हणून ही रामकृष्णांची ओळखच खरी महत्त्वाची असून हे रामकृष्ण आजही विश्वव्यापी असून तळमळ असेल तर दर्शन देणारे आहेत, आता देत आहेत व पुढेही देत राहतील. यापेक्षा काय सांगावे? म्हणून अभंगाच्या पहिल्या चरणात म्हटले आहे 'कृष्ण तोचि राम, राम तोचि कृष्ण । तेचि रामकृष्ण ओळखावे ।।१।।'

रामकृष्णांचा जो अवतार झाला तोच इतका बोलका आहे. रामकृष्ण या जीवनाच्या दोन गती हंसस्थितीत आल्याने, त्या अवस्थेत ते परमहंस झाले. 'अगा सर्व जीवांचे शरीरी । परमात्म हंसपदाची थोरी । अखंड असतसे गोचरी । परी नेणती अज्ञान ।।' या श्रीज्ञानेश्वर माऊलींच्या उत्तरगीतेवरील टीकेतील महत्वपूर्ण ओवीप्रमाणे सोऽहं गती ही विश्वव्यापी आहे. तेथे ज्यांचे तादात्म्य झाले, तेच परमहंस होतात. 'सोऽहंसाय विद्महे । परमहंसाय धीमहि । तन्नो हंसः प्रचोदयात् ।।' ही सोऽहं गायत्री हेच दर्शविते. तर 'हंसावरती राम बैसुनी चालले हो पुढती । हंस कसा बघ उड्डाण करितो खाली आणि वरती ।।' या पद्यात आमचे श्रीतात्यासाहेबांनी हाच निर्वाळा दिला आहे. श्रीतात्यासाहेबांचे व भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे केवळ परमकृपेने रामकृष्ण समोर उभे राहिले. त्यांनी दोन्ही हात वर केले आणि आशीर्वाद दिला. त्यांचे ठायी मन जडून गेले. या दृष्टीने या अभंगाचे तिसरे कडव्यात 'ऐसे स्वामी रामकृष्ण परमहंस । जडले मानस तये ठायी ।।' असे उधृत केले आहे.

या रामकृष्णांनी 'आई आई आई' म्हणता टाहो फोडला की कालीमाता प्रत्यक्ष प्रगट होत असे. 'आई तुमच्याशी बोलती व तुम्ही आईशी बोलता हा भासच ना?' असा प्रश्न एकदा श्रीविवेकानंदांनी रामकृष्णांना केला. तेव्हा ते म्हणाले, 'अरे नरेंद्र, तू आणि मी बोलतो हा भास आहे, पण काली माता प्रगट होऊन बोलती, तो आमचा संवाद म्हणजे भास नव्हे ते प्रत्यक्ष आहे. तू आणि मी आपण नाहीसे होऊ. पण कालीमाता ही चिरंतन शक्ती आहे. त्यामुळे त्यालाच एक सत्यता आहे.' यावर मग विवेकानंदांना मोठा बोध झाला आणि बुद्धिवाद हा येथे थिटा पडला. या प्रकारे रामकृष्ण ही विश्वाची माऊलीच होऊन राहिली. म्हणून अभंगाचे चौथ्या कडव्यात 'कालीमाता प्रगट रामकृष्ण केली । भलीच माऊली रामकृष्ण ।।' असे म्हटले आहे.

नरेंद्रांचे ठायी विवेक जागृत झाला, तो रामकृष्णांचे कृपेने झाला. 'नित्यानित्यवस्तु विवेकः' असे जगद्गुरू श्रीशंकराचार्य म्हणतात. नित्य

काय आणि अनित्य काय याची छाननी हाच तो विवेक आहे. 'विवेक हा श्रेष्ठ विचार हा श्रेष्ठ । बोलती वरिष्ठ संतमुनी ।।' या अभंग चरणात माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांनी विवेकाची श्रेष्ठता प्रस्तुत केली आहे. या विवेक जागृतीने श्रीनरेंद्रांना परिपूर्ण असा आनंद झाला म्हणून ते खऱ्या अर्थाने जगद्‌गुरू स्वामी विवेकानंद झाले. जगप्रसिद्ध झाले. या दर्शनाने दासरामास सिद्धानंद प्रगट झाल्याचा आनंद झाला. म्हणून या अभंगाचे पाचव्या कडव्यात 'विवेक आनंद ते विवेकानंद । लाभे सिद्धानंद दासरामा ।।५।।' असे म्हटले आहे.

श्रीमुकुंदराजपंथी सुप्रसिद्ध संत श्रीरामानंदमहाराज खटावकर यांचे पुढे बालपणी माझे कीर्तन चालू असता, सुगंध दरवळल्यावेळी श्रीनिंबरगीकरमहाराज हे सिद्धानंदरूपाने प्रगट झाले आहेत असे उत्स्फूर्त उद्गार त्यांनी काढले. त्याचप्रमाणे श्रीक्षेत्र नरसोबावाडीस परमप्रिय स्वामीभक्त श्रीबापूसाहेब चाफळकर यांचे समवेत श्रीदत्तयोगी श्रीमहादबामहाराज पाटील यांचे उभारलेल्या वास्तूत वास्तुशांतीचे मंगल प्रसंगी माझे निरूपण झाले, त्यावेळी सुगंध पसरला असता, श्रीपाटीलमहाराज यांनी श्रीरामानंदांचे प्रमाणेच उद्गार काढले याची आठवण मला जो सिद्धानंद हा अभंग चि. यशवंत केशव आपटे यास कीर्तनात सांगत असताना झाला, त्यावेळी प्रकर्षाने झाली, म्हणून हा उल्लेख येथे केला आहे. भगवान रामकृष्णांचे दर्शन, स्मरण वा आठवण या साऱ्याच गोष्टी प्रभावी आहेत हे यावरून दिसून येईल.

***

## अभंग २

**चैतन्य चैतन्या पडे जरी खेव । तरी अनुभव येत असे ।।१।।**
**रामकृष्ण तेचि भगिनी निवेदिता । तैसी निवेदिता रामकृष्ण ।।२।।**
**जीव शीव दोनी एकरूप होती । ऐसी हे प्रचिती संती आली ।।३।।**
**गुरुलिंगनाथे नवल दाविले । प्रगट पाऊले *दासरामी* ।।४।।**

चैतन्याने चैतन्याशी तादात्म्य होऊन चैतन्याचेद्वारा चैतन्याची अनुभूती घेणे, हाच या संजीवन पाठातील दुसऱ्या अभंगाचा मुख्य विषय आहे. चैतन्याची चैतन्याला जर घट्ट मिठी बसली तरच अनुभव घेता येतो. चैतन्य हे तरी वायुरूप आहे. प्राणोब्रह्मैति, प्राणोमाता, प्राणोपिता किंवा प्राणैव आत्मा अशी श्रुती आहे. 'नासिकेचा प्राण कोण मार्गी येत । नाद दुमदुमत अनुहाती ।।' असे श्रीज्ञानेश्वरमहाराज एका अभंगात सांगतात. प्राणाचा ठराविक मार्ग म्हणजेच प्राणायाम. प्राण ज्या मार्गाने जातो, त्याच मार्गाने येतो व ज्या मार्गाने येतो त्याच मार्गाने तो जातो. याचा अर्थ प्राणाचा मार्ग हा ठरलेलाच आहे. बाकी आपल्याला फुटेल तो मार्ग. कोणत्याही मार्गाने यावे-जावे असे होत असते. प्राण हेच खरे चैतन्य असून त्यालाच आत्मा किंवा ब्रह्म ही संज्ञा आहे. आत्मा काय आहे याचा शोध उपनिषदकाली प्राचीन ऋषीमुनींनी लावला आहे. कानात बोटे घालून पहा किंवा डोळ्यावर बोट धरा. काही नाद ऐकू येतील. डोळ्यात चक्रे फिरल्यासारखे होऊन तेजाचे उमाळे दिसो येतील. यावरूनच अध्यात्माने आत्म्याचा मागोवा घेतला आहे. लहान मुले कानात बोट घातल्यावर धडधड आवाज होतो. तो आवाज कसला? म्हणून विचारतात व मोठी माणसे रावणाचा अंगठा जळतो आहे असे उत्तर देतात. मग

त्यांना सांगावे तरी काय? असा प्रश्न आहे. तात्पर्य, नादप्रकाशयुक्त आत्मा जाणून घ्यावयाचा आहे. नादप्रकाशयुक्त जीवन हेच आत्मस्वरूप आहे. यालाच 'सोऽहं आत्मा स्वानंदघन' असे समर्थ म्हणतात. म्हणून ज्याला आत्मानुभव घ्यावयाचा आहे, त्याने विशिष्ट पद्धतीनेच तो घेतला पाहिजे, असे त्यातील इंगित आहे. 'दिव्या वाऱ्या घाली खेव । याचा घ्यावा अनुभव । तुका वैकुंठीचा राव । गत है न्यारी ।।' असे हे गुपित श्रीमंत तुकोबाराय यांनी आपले अभंगात निर्दिष्ट केले आहे. आपल्या जीवनात दिवा आहे म्हणून आले अंग हे उबदार असते. दिवा म्हटले की तेथे तेज, प्रकाश या गोष्टी स्वाभाविकच आहेत. 'नवल प्रकाश प्रकाशा वेगळा । झाकिलीया डोळा पुढा दिसे ।।' असे श्रीनिळोबाराय यांचे वचन आहे. हा अंधार आहे आणि हा प्रकाश आहे हे ज्यामुळे आपणास ज्ञात होते असा तो प्रकाश, डोळा झाकल्यावर प्रतीत होतो. इकडे डोळेझाक करून चालणार नाही. गुरूकृपेने हे वर्म आपण समजून घेणे अगत्याचे आहे. भगवान शंकरांनी पार्वतीमातेला षण्मुखी आणि शांभवी मुद्रा यासाठी तर सांगितली होती. पूर्णस्वरूप संतांना आपला मरणकालही या साधनेने ज्ञात होत असे. 'कानी घालोनिया बोटे नाद जे ऐकावे । न ऐकता जाणावे नऊ दिवस ।।१।। नासिकेचे अग्र न दिसे नयनी म्हणा तेचि दिनी रामकृष्ण ।।२।।' या शब्दात श्रीज्ञानेश्वर माऊलींनी गौप्यस्फोट केला आहे. यादृष्टीने नादानुसंधान म्हणजेच नामानुसंधान किंवा आत्मानुसंधान फार महत्वाचे आहे. याकरिता तर येथे विवेचनास घेतलेल्या मूळ अभंगात म्हटले आहे, 'चैतन्य चैतन्या पडे जरी खेव । तरी अनुभव येत असे ।।१।।' नाद प्रकाश हाच केवळ आत्मानुभव आहे. 'अनुभवे अनुभव अवघाचि साधिला । तरीच स्थिरावला मनु ठायी ।' हे तुकोपनिषद येथे चिंतनीय आहे. या अनुभवाने मन स्थिर होते. किंबहुना मन स्थिर होणे, मनोलय होणे हाच एक पवन विजयाने प्राप्त होणारा आत्मानुभव आहे.

बाह्यांगावर याची महती नाही. संतांनी स्वात्मानुभवानेच या अध्यात्माच्या वाटा चोखाळल्या आहेत. 'स्वात्मानुभवी चोखाळिल्या वाटा । त्याचे माथा जटा असो नसो ।।' असे श्रीतुकाराममहाराज ठणकावून सांगत आहेत. तर 'ज्ञानदेव म्हणे अनुभवी जाणे । अनुभवावाचुनि काहीच नेणे ।।' या शब्दात अनुभवी कोण आहे, त्याला जाणणे हाच तो अनुभव आहे, असे दाखवून श्रीज्ञानराजांनी अनुभवगम्य दर्शविले आहे. 'हे खूण गुरू जाणे गुरू जाणे । येरा टकमक वाणे ।।' या पदात केशवस्वामींनी ही खूण ज्यांना गवसली नाही तेथे नुसती टकमक आहे हे स्पष्ट केले असून, 'हे खूण जाणे तो स्वात्मानुभवी । येर ते गोसावी आडनावाचे ।।' असे स्पष्टपणे उघड केले आहे.

भगवान रामकृष्ण आणि भगिनी निवेदिता या अंतरिकपणे एकरूपच असल्याने, 'रामकृष्ण तेचि भगिनी निवेदिता । तैसी निवेदिता रामकृष्ण ।।२।।' असे अभंगाचे दुसऱ्या कडव्यात उधृत केले आहे.

येथे जीव शीव हे देहभाव पार लयाला गेल्याने एकरूपच झालेले आहे. देहाशी संलग्न असणारा अहंकार सकाराशी निमग्न झाला आहे. यामुळे येथे एक साक्षात्कारच घडला आहे, अशाप्रकारची प्रचिती सर्व संतांनी घेतली असून, ही प्रचिती घेणारे संत, ही निर्विवाद गोष्ट आहे. भगवान रामकृष्ण परमहंस यांचा सांप्रदाय, आमच्या चिमड सांप्रदायापेक्षा वेगळा नाही. अशा तऱ्हेचे एक मोठे नवल भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी आपल्या कृपेने दाखविले असल्याने, ही चरणकमले दासरामापुढे प्रगट होऊन राहिली. या योगे या मूळ अभंगाचे चौथ्या कडव्यात 'गुरूलिंगनाथे नवल दाविले । प्रगट पाऊले दासरामी ।।४।।' असे म्हटले आहे. यावरून चैतन्य चैतन्याची खेव किती महत्त्वपूर्ण आहे, याची साहजिकच उकल होईल असे वाटते.

***

## अभंग ३

श्यामल रुपडे । विटेवरी ठाके पुढे ।।१।।
दिससी तू शामला । तुझा रंग यावा मला ।।२।।
माझे रूप तुला यावे । स्वरूप देखेन बरवे ।।३।।
तुझेमुळे माझा ढंग । तव ठायी झालो दंग ।।४।।
माझा रंग तुझे गुणी । ऐसी बोलियेली जनी ।।५।।
अखंड प्रीती रस । *दासरामी* या सुरस ।।६।।

भगवान रामकृष्ण परमहंस हे श्यामल स्वरूपात पांडुरंगाप्रमाणे विटेवर पुढे उभेच राहिले. संतमहात्मे हे परमात्म स्वरूपच असतात. 'साधू दिसती वेगळाले । परी ते स्वरूपी मिळाले । अवघे मिळोनी एकचि झाले । देहातीत वस्तू ।।१।।' साधू वेगवेगळेपणाने दिसले तरी ते स्वरूपाकार असल्याने, एक देहातीत वस्तुरूपच ते असतात. विटेवर होणारे साधुचे दर्शन हे परमोच्च आहे. 'बाप रखुमादेवीवरू सगुण निर्गुण । रूप विटेवरी दाविली खूण ।।' हे श्रीज्ञानोबा माऊलींचे सूत्र अध्यात्मदृष्ट्या मोठे लक्षणीय आहे. 'नामा म्हणे जीवे करीन लिंबलोण । विटेसहित चरण ओवाळीन ।।' या वचनाप्रमाणे विटेचे महत्व फारच श्रेष्ठ आहे. 'सोऽहं ब्रह्म विटेवरी । बरवे शोधावे अंतरी ।।' या श्रीतुकोक्तीप्रमाणे सोऽहं स्वरूप रामकृष्ण विटेवर दृग्गोचर झाले, यातच त्याचे खरेखुरे रहस्य आहे. 'श्यामल रुपडे उभे विटेवरी' ही उक्ती विचारात घ्यावी अशी आहे. शेगावचे श्रीगजानन महाराज यांनी आपले एका भक्तास श्रीविठ्ठरायाचे रूपातच दर्शन दिले होते. भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस हे कीर्तनात देहभान विसरून नाचत असता, श्रीगुरूदेव रानडे हे श्रीकाकासाहेब तुळपुळे यांचा हात दाबून 'हे ब्रह्म कसे नाचते आहे पहा' असे म्हणाले आणि आश्चर्य, श्रीकाकासाहेबांनाही तसेच दिसू लागले.

मला तरी ही गोष्ट श्रीकाकासाहेबांनीच त्यांचे आयुष्याचे अखेरी अखेरीस सांगितलेचे स्मरते. म्हणून येथे त्याचा उल्लेख केला आहे. माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांचे कीर्तनात आमचे घरी बुधगावचे विदेही साधू गुंडूबुवा नाचू लागले की, पंढरीचा विठोबा प्रत्यक्ष नाचतो आहे असेच भाविकांना आणि तार्किकांनाही दिसत असे. माझे कीर्तनात असाच विषय निघाला असता, सारे वातावरण भाराऊन गेले आणि 'काय हो, आज येथे श्रीरामकृष्ण परमहंस प्रगट झाले आहेत काय ?' असे श्री. हलदुले यांना विचारताच, त्यांचे डोळ्यातून प्रेमाश्रु ओघळू लागले. आजच आमचे येथे शनिवार दि.१०.०१.१९८७ रोजी पौष शुद्ध ११, शके १९०८ रोजी सकाळी नाशिकचे साक्षात विष्णूच, विद्यावाचस्पती श्रीविष्णुजी क्षीरसागर आणि त्यांचेबरोबर एदलाबाद येथील हरिसाधना आश्रमात वावरणाऱ्या श्रीरामकृष्ण परमहंस कृपांकित देवतास्वरूप चित्शक्ती श्रीअम्मा आल्या असता, मला रामकृष्णांचे दर्शन झाले व दोन्ही हात वर केलेले रूपात त्यांनी आशीर्वाद दिला व त्यांचेवर मला २६ अभंग स्फुरले. पहिले दोन अभंग कीर्तनातच दि.०८.०५.१९८६ रोजी चि. यशवंत केशव आपटे यास सांगितले. त्याने ते लिहिले. रात्री वट्ट २६ अभंग लिहून झाले. त्याची पुनः प्रत केली. तोच दिल्लीहून तेथील श्रीरामकृष्ण आश्रमातील श्रीनिरंजनानंद स्वामी मला श्रीरामभाऊ चिपळूणकर यांचे समवेत भेटणेस आले. मागे येथे प.पू. श्रीभौमानंद येऊन गेले. श्रीरामकृष्णांची जन्मशताब्दी आमचे येथे थाटात झाली वगैरे मजकूर सांगत असता, श्रीअम्मांचे डोळे अक्षरशः पाणावले व नेत्रातून प्रेमाश्रु ओघळू लागले. ही श्रीरामकृष्णांचे विटेवरील झालेल्या दर्शनाची पावतीच आहे असे म्हटल्यावाचून माझ्याने राहवत नाही.

चित्शक्तीचा रंग श्यामल असून, त्याचे महत्व अपार आहे. श्रीचिमडचे महाराजांनी मला 'दृष्ट्वा दृश्यं व्योमं पीतं शुभ्रं ताम्रं नीलं धवलं श्यामं' पर्यंत आणले आहे असे उद्गार श्रीचिमडचे महाराज यांचे

अधिकारी शिष्य श्रीदत्तोपंत कुलकर्णी कुंभोजकर यांनी श्रीचिमडचे महाराज यांच्या अधिकारी शिष्या श्रीवेणुमावशी यांचे काढले असलेले परमप्रिय श्रीतात्या कुंभोजकर यांनी मला सांगितल्याचे स्मरते. श्री. तात्या कुंभोजकर हे परमप्रिय प्रा. म. अ. कुलकर्णी (स्वामी प्रज्ञानंद) यांचे वडील असून श्रीहालसिद्धनाथांचे परम भक्त होते. यावरून मला काय अभिप्रेत आहे ते अधिक स्पष्ट होईल. म्हणून असा रंग जर जीवाला प्राप्त झाला तर तोच खरा आत्मरंग आहे, हे स्पष्ट आहे. म्हणून 'दिससी तू श्यामला । तुझा रंग यावा मला ।।२।।' असे या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात एक हृद्गद प्रगट केले आहे. जीवाला चित्शक्तीचा रंग आला तर चित्शक्ती तरी त्या जीवापेक्षा वेगळी कशी राहणार, तो जीव त्या शक्तीचाच होणार, यादृष्टीने 'माझे रूप तुला यावे । स्वरूप देखे न बरवे ।।३।।' असे अभंगाचे तिसऱ्या कडव्यात नमूद केले आहे. ही जी अवस्था हाच एक स्वरूप साक्षात्कार आहे. 'स्वरूपाचा आनंद । तेचि स्वामी स्वरूपानंद ।।१।। आनंदाचे जे स्वरूप । अमलानंद निर्विकल्प ।।२।। संतांचे संगती । दासरामा आनंद किती ।।३।।' हा अभंग येथे लक्षणीय आहे. चित्शक्तीमुळेच केवळ प्रकृतीचे सारे ढंग चालतात. म्हणून हे जीवन तेथेच दंग होऊन राहिले आहे. 'तुझेमुळे माझा रंग । तव ठायी झालो दंग ।।४।।' असे या अभंगाचे चौथ्या कडव्यात यासाठीच म्हटले आहे. चित्शक्तीचे दृष्टीवरच या शरीराचा सारा खेळ आहे. 'माझा रंग तुझे गुणी । बोले नामयाची जनी ।' हा श्रीजनाबाईंचा सिद्धांत अती मोलाचा आहे. हे जे गुरूप्रेम आहे त्याला तोडच नाही. म्हणून 'माझा रंग तुझे गुणी । ऐसी बोलियेली जनी ।।५।।' असे अभंगाच्या पाचव्या कडव्यात प्रस्तुत करून हे भक्तीचे नाटक चार दिवसांचे नसून, जन्माचे किंवा जन्मोजन्मीचे असल्याने 'अखंड प्रिती रस । दासरामी या सुरस ।।६।।' या अभंगाचे सहाव्या कडव्यात हा प्रीती रस अखंड आहे. यात कधीच तसूभरही फरक होणार नाही हेही निर्दिष्ट आहे.

***

## अभंग ४

होती हातवारे । त्यात तुझे भरो वारे ।।१।।
एकचि हे वारे । त्यात आले काही सारे ।।२।।
ज्यातील गेले वारे । त्यात काय उरले वारे ।।३।।
ऐसे एक वारे । तेणे जग फिरे सारे ।।४।।
जया मागे वारे । तेथे भक्ती काय खरे ।।५।।
वाऱ्यावरी दृष्टी खिळे । *दासराम* पायी लोळे ।।६।।

माझे जे हातवारे होत आहेत, त्यात देवा तुझे वारे आहे म्हणून. नाही तर हे शक्य तरी आहे का? शरीराची हालचाल तुझ्यामुळे होत आहे, याची जाणीव मला सतत रहावी हे म्हणण्याचा भावार्थ आहे. कारण 'वाराचि देव आमुचा' हे वचनच खरे सत्य आहे. एक वाऱ्यातच सर्व काही आले आहे. कारण वाऱ्याशिवाय दुसरे खरे तर काही नाहीच आहे. ज्यातील वारे गेले, त्याला मग अस्तित्वच रहात नाही. म्हणून एक वारेच असे आहे की, ज्यामुळे हे सारे जग गरगर फिरतच राहिले आहे. ज = जन्माला येणे व ग = गमनागमन होणे. याचे नावच जग आहे. हे चित्र विचित्रमय आहे, म्हणून तर हे चित्रमय जगत आहे. मागचे वारे असेल तरच पदार्थ, प्राणीमात्राची आणि जीवाची प्रगती होते. पुढे जर वारे सुरे झाले तर प्रगती कुंठते. प्रगती होतच नाही. मग पीछेहाट झाली म्हणूनच समजावे. 'वाऱ्यावरी लागली नजर । देहभानाचा पडला विसर ।' या उक्तीप्रमाणे वाऱ्यावर जर नजर गेली तर या देहभानाचा विसर पडतो, इतके त्याचे महत्व आहे. अशा या चैतन्यात्मक वाऱ्यावर जर गुरूकृपेने नजर खिळून राहिली, तर त्याचे पायाशी हा दासराम लोळण घेत राहील, यापेक्षा काय सांगावे. असे या वाऱ्याचे एक आगळे महत्व आहे. हाच

सर्व आशय या चौथ्या अभंगात क्रमशः सांगितला आहे. यापेक्षा काय म्हणता येईल? म्हणूनच हे वारेच माझ्या प्रत्येक हालचालीत भरून राहू दे. त्याशिवाय हालचाल होत नाही हे जरी खरे असले तरी त्याची जाणीव सतत होत रहाणे हेच अत्यंत आवश्यक आहे. जी जाणीव ज्ञानरूपाने प्रतीत होते, त्यातच प्रत्ययकारी आनंद आहे. आणि यालाच साक्षात्कार म्हणतात. म्हणून ही प्रार्थना वायुदेवास आणि वायुदेवतेस करून त्याचे महत्व किती आहे, त्याशिवाय सारे जीवन व्यर्थ कसे आहे, हाच सिद्धांत या अभंगी प्रस्थापित केला आहे असे आपणास दिसून येईल.

***

## अभंग ५

ज्यात काही हालचाल । तरी काही हालचाल ।।१।।
वारियाची बदले चाल । तरी होती फार हाल ।।२।।
ज्यात काही राम आहे । त्यात काही राम आहे ।।३।।
ज्यात काही रस नाही । त्यात काही रस नाही ।।४।।
*दासराम* बोले । ऐकुनिया सद्गुरू डोले ।।५।।

आत काही चैतन्यवायूची हालचाल आहे, त्यायोगे साऱ्या जड सृष्टीची हालचाल होत आहे. सृज या पासून सृष्टी हा शब्द बनला आहे. अशी या शब्दाची व्युत्पत्ती आहे, उलट निर्माण झालेल्याचा नाश होणे हा निसर्ग आहे. निसर्गाला विसर्ग मिळाला की चैतन्याचा साक्षात्कार आहे. सृज याचे उलट विसृज या शक्तीने दृश्याचे विसर्जन आहे. शरीराची हालचाल, चैतन्याचे हालचालीने होते. पण चैतन्याचे हालचालीने शरीराची हालचाल होते हे ज्ञान शरीराच्या हालचालीचेच केवळ बाह्याकर्षणाने कळत असल्यामुळे, चैतन्याचे हालचालीची जाणीव जीवमात्रास होत नाही, ही तर खरी गंम्मत आहे. शरीराची हालचाल बंद झाली तर अंतर्यामी होणाऱ्या चैतन्याची हालचाल प्रतीत होते. 'पाहे आत्म्याची चळवळ । तोचि ज्ञानीया केवळ ।।' हा माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांचा सिद्धांत महत्वाचा आहे. 'न करवे हालचाली । निवारली चिंता ही ।।' हे श्रीतुकोपनिषद येथे लक्षणीय आहे. शरीरात खेळणाऱ्या वाऱ्याची चाल बदलली तर अंतकाल जवळ आला असे ज्ञानी ओळखतात. या बदलत्या चालीत जीवाचे फार हालच होतात, ही गोष्ट स्पष्ट दिसणारी आहे. कारण त्याला श्वासोश्वास करणे अवघड जाते. 'मी कोणाचेही वाईट केले नाही,

मग आता मला देव का त्रास देत आहे?' हे सौ. सीताबाई केळकर यांचे आयुष्यातील शेवटचे शब्द या सिद्धांतावर प्रकाश टाकीत आहेत. कारण सौ. वहिनींना त्यावेळी श्वासोश्वास करणेच कठीण झाले. देव त्यांना आपल्या रूपात मिसळून घेत होता. ते दृश्य नुसते आठवले तरी अंतःकरण अगदी हेलावून जाते. वीज लखाकून जावी एवढ्या अल्प काळातच सौ. वहिनी फाल्गुन शुद्ध १० शके १९०४ गुरूवार इ.स. १९८३ रोजी स्वरूपाकार झाल्या आणि सर्वात विशेष म्हणजे, त्यांची साधना शेवटच्या दिवसापर्यंत त्यांनी साधली होती. तात्पर्य, ज्यात काही राम आहे, त्यात काही राम आहे. राम आहे म्हणून आराम आहे. तोच प्राणीमात्राला रममाण करतो. 'रमयन्ति इति रामः' असे यासाठीच म्हटले आहे. ज्यात काही अर्थ आहे, त्यात काही अर्थ आहे हे म्हणण्यातही काही अर्थ आहे. नाही तर मग कशात अर्थ आहे? असा प्रश्न आहे. ज्यात काही रस आहे, त्यात काही रस आहे, ज्यात काही रस नाही, त्यात काही रस नाही, यातच खरे स्वारस्य आहे. 'रसोवैसः' ही श्रुती यादृष्टीने महत्त्वाची आहे. रसानेच रसग्रहण होते, नाही तर सारा विरसच आहे. 'अरसिकेषु कवित्त्व निवेदन शिरसि मा लिख । मा लिख सुभाषित' किंवा 'गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता' ही म्हण येथे लक्षणीय आहे. जसा हा विषय स्फुरला, तो ऐकून भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांना खराच डोल आला म्हणून 'दासराम बोले । ऐकुनिया सद्गुरू डोले ।।' असे या अभंगाच्या पाचव्या कडव्यात नमूद केले आहे. आमचे श्रीतात्यासाहेब म्हणतात, 'मना रामपाया कदा तू न सोडी । मना रामनामी धरी नित्य गोडी । मना सद्गुरू राम प्रेमे भजावा । मना राम तो अंतरी साठवावा ।।१।।'.

***

## अभंग ६

**श्यामलांग तुझे ऐसी आठवण । आहे बहुदीन माझे मनी ।।१।।**
**पारदर्शक हे जसे काही भिंग । तसे तुझे अंग वायुदेवा ।।२।।**
**वायु हाचि देव वायु हाचि देव । ऐसा माझा भाव वायुवरी ।।३।।**
**असाल तैसे असा माझे ठायी आता । शरण समर्था *दासराम* ।।४।।**

हे देवा, तुझे अंग हे श्यामल आहे अशी फार पूर्वापार मला आठवण आहे. माझे मनात ते स्वरूप जसेच्या तसे आहे. 'कमल नयन घनःश्याम तनू हो । मोर मुगुट पीतांबर शोभे रत्नखचित घनःश्याम तनु हो ।।' ही संतोक्ती येथे लक्षणीय आहे. हे पद भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे कीर्तनात येत असून, माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांचे कीर्तनात, श्री. मणेश्वर अत्रे हे क्वचित प्रसंगी हे पद्य म्हणत असत. त्यातील वर उधृत केलेले चरण सहजच आठवले. परमात्मा हा श्यामतनू आहे. 'आसपासमो श्वेत भरा है । श्वेतके बीचमे श्याम । श्याम के बीचमे पुतली चमके । वो जाना कबीरका राम ।।' या शब्दात श्रीकबीरसाहेब हे आत्मारामाचे वर्णन करताना दिसतात. तर 'दृष्ट्वा दृष्यं व्योमं पीतं शुभ्रं ताम्रं नीलं धवलं श्यामं अभिनव नवरंगम्' या वचनात श्रीचिमडचे महाराज आत्मस्वरूपाचा श्यामवर्ण दर्शवितात. 'श्याम वर्ण ते गोल्हाट । नील बिंदू औटपीठ ।' या शब्दात आत्मसाक्षात्कार श्रीजनाबाई प्रगट करतात. म्हणून या अभंगाचे प्रथम कडव्यात 'श्यामलांग तुझे ऐसी आठवण । आहे बहुदीन माझे मनी ।।१।।' असे म्हटले आहे.

'आत्मयाचे अंग । पारदर्शक जैसे भिंग ।।' या उक्तीप्रमाणे आत्म्याचे अंग हे पार अपारदर्शक आहे. त्यात काही झाकून रहातच नाही. दृष्टीचा डोळा उघडला तर ते स्पष्टपणे वरील असणाऱ्या आवरणातूनही दृग्गोचर होते. म्हणून 'पारदर्शक हे जसे काही भिंग । तसे तुझे अंग वायुदेवा ।' हे या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात याच दृष्टीने म्हटले

आहे. 'वायु हाचि देव वायु हाचि देव । ऐसा माझा भाव वायुवरी ।।' या तिसऱ्या कडव्यात वायुदेवाचे वर्णन केले आहे. वायुदेव हाच देव असा माझा या आयुष्यात एक भाव आहे.

श्रीसमर्थांनी दासबोधात वायुदेवाचा एक समासच घातला आहे. तो मुळातूनच पहावा इतका महत्त्वाचा आहे. श्रीगुरूदेव रानडे हे आमचे घरी आले असता, आम्ही रोज दासबोधातील सख्य भक्तीचा समास आमचे भजनात म्हणत असतो, तुम्हाला कोणता समास आवडतो? असा त्यांनी श्रीमामांना प्रश्न केला. त्यावर 'नामाचा समास मला आवडतो' असे मामा म्हणाले. यावर 'रामभाऊ, तुम्हाला कोणता समास आवडतो?' असा श्रीगुरूदेवांनी मला प्रश्न केला. यावर 'मला वायुदेवाचा समास आवडतो' असे उत्तर दिले. यावर गुरूदेव मुक्तपणाने हसले व म्हणाले, 'बापूराव, आम्ही नित्यनेमावलीचे पुढील आवृत्तीत नामाचा समास घालू. वायुदेवाचा समास हा सर्वांना पेलणारा नाही' असे म्हणत त्यांनी पुढील आवृत्तीत नामाचा समास प्रविष्ट केला. अर्थात ही गोष्ट इतरांना माहिती असण्याचे कारण नाही. आमचे येथेच ती घडल्याने आणि हा सहज प्रसंग आल्याने ती येथे प्रस्तुत केली आहे. वायुदेवाचा समास हा महत्वाचा आहे हे श्रीगुरूदेवांनाही मान्य आहे असा याचा अर्थ सहजच होत आहे. 'सत्य ज्ञानानंत गगनाचे प्रावर्ण । नाही रूप गुण वर्ण जेथे ।।१।। तो हा गे श्रीहरी पाहिला डोळाभरी । पहाता पाहणे दुरी सारोनिया ।।२।।' ही ज्ञानेशोक्ती येथे विचारात घ्यावी अशी असून, यात वायुरूप आत्मसाक्षात्कारच प्रतीत होत आहे असे दिसून येईल. मी जो कोणी मूलगामी आहे, त्या माझे ठिकाणी तुम्ही असाल तसे असणेपणाने वास्तव्य करून, होणेपणा पार घालवून तुम्ही मी जो कोणी आहे, त्या माझे ठायी असा. तुम्हाला दासराम शरण आहे. कारण आपण खरे समर्थ आहात, अशी प्रार्थना या अभंगाचे शेवटी केली आहे. 'आता असाल तैसे असा । सद्गुरू स्वामी ।।' हा श्रीसमर्थांचा आशय समर्थपणे असणेपणाचे महत्त्व स्पष्ट करतो यावरून मला येथे काय अभिप्रेत आहे ते स्पष्ट होईल असे वाटते.

## अभंग ७

**पहाता हे सर्वांग । श्यामलांग कोमलांग ।।१।।**
**नाही कळले अंग । काय अध्यात्माचे अंग ।।२।।**
**आत्मयाचे अंग । पारदर्शक जैसे भिंग ।।३।।**
**जे का असे परपार । जयालागी नाही पार ।।४।।**
**तेचि करी परपार । उपकार ते अपार ।।५।।**
***दासरामा* त्याचा ध्यास । नाम घेई अहर्निश ।।६।।**

सर्वांग हे श्यामलांग आणि कोमलांगच कसे जीवाला सर्वातून परपार करणारे आहे हा सिद्धांत या अभंगात ग्रथीत आहे. 'सर्व ब्रह्म ते निःशब्द' या उक्तीप्रमाणे सर्व हा शब्द ब्रह्माला आहे. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' ही श्रुती, सर्व हे ब्रह्मच आहे असे दर्शविते. सर्व कळले तर 'स्व'चा बोध होतो आणि 'स्व'मुळे सर्व ज्ञान होते. असे हे सर्वांग जे श्यामलांग असून, पुनः कोमलांग आहे, ते या जीवाचे सारसर्वस्व आहे हे उघड आहे. 'कोवळे ठुसठुशीत मोतीयाचे घड' असे श्रीज्ञानेश्वर माऊली या कोमलांगाचे यथार्थ वर्णन करते. परमात्मा हा तरी श्यामतनू आहे. श्रीज्ञानेश्वर नमन स्तोत्रात 'रुणु झुणु रुणु झुणु । ऐसा वाजविसी वेणू । सुंदर तू श्यामतनू । अलंकापुरी उभा अससी ।।' असे १०५ व्या ओवीत म्हणतात. श्रीक्षेत्र अलंकापुरी परमात्मा हा अनहत वेणू निनादित श्यामतनू उभा आहे असे या साक्षात्काराचे रहस्यपूर्ण रहस्य आहे. हे अंग ज्याला कळले नाही, त्याला अध्यात्माचे काय अंग आहे असा प्रश्न आहे. या दृष्टीने या अभंगाचे प्रथम आणि द्वितीय चरणात 'पहाता हे सर्वांग । श्यामलांग कोमलांग ।।१।। नाही कळले अंग । काय अध्यात्माचे अंग ।।२।।' असे म्हटले

आहे. 'परी ते तुज नाही ठावे। जेणे अंगे ब्रह्म व्हावे ।' असे श्रीसंत तुकोबाराय यादृष्टीनेच प्रतिपादन करीत आहेत. तत् ने जे निर्दिष्ट होते, त्या लक्षाचे भेदन करून जीवन ऊर्ध्वगामी झाले की, ज्या अंगाने या चिदंगाचा स्पर्श होतो, ते अंग आपल्या अनुभवाने स्पष्ट करून आपल्या पुढे प्रचितीस आणून देत आहेत. 'ते लक्ष भेदोनी वरी जो जाणे अंगा । तुका पांडुरंगा भेटी तेथे ।' या वचनात हे सार समाविष्ट आहे. आत्म्याचे अंग हे पारदर्शक भिंग असून ते परपार अपार असल्याने, त्याला कोठे पारच नाही आणि ते प्राणीमात्राला या भवातून परपार करणारे असल्याने त्याचे उपकार तरी अपार आहेत, हे या अभंगाचे तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या चरणात स्पष्ट केले आहे. 'आत्मयाचे अंग । पारदर्शक जैसे भिंग ।।३।। जे का असे परपार । जयालागी नाही पार ।।४।। तेचि करी परपार । उपकार ते अपार ।।५।।' मला काय म्हणावयाचे आहे याची यावरून कल्पना येईल. 'ते हे विठ्ठल चरण । पार नाही तुका म्हणे ।' ही श्रीतुकोक्ती येथे चिंतनीय आहे. यादृष्टीने भगवंताच्या नामाचा ध्यास लागला पाहिजे की, या साऱ्या गोष्टी आपोआप घडतात असे हे नाममहात्म्य आहे. 'हे सर्व काही नामाच्या योगाने होते' हे श्रीमामांचे हरिकीर्तनात नित्यशः येणारे उद्गार अत्यंत महत्त्वाचे आहेत. यासाठी या अभंगाचे शेवटच्या चरणात या चिदंगाचा ध्यास असल्याने अहर्निश नामच महत्त्वाचे आहे हे स्पष्ट केले आहे. 'दासरामा त्याचा ध्यास । नाम घेई अहर्निश ।।६।।'

***

## अभंग ८

वारे शिरले नयनात । तेथे जाहला एकांत ।।१।।
वीज सळसळोनी गेली । चित्तवृत्ती तल्लीन झाली ।।२।।
अनुग्रहाची हे पीडा । बंद पिंगला आणि इडा ।।३।।
*दासरामा* हनुमंत । गूज सांगे परमार्थ ।।४।।

'श्रवणातुनी नयनी आलो । नयनी निजाते मिळालो ।।' या उक्तीप्रमाणे डोळा आणि कान यात चार बोटांचे अंतर आहे. ते तुटले की परमार्थ झाला. एवढाच खरा जीवनाचा प्रवास आहे. तुम्ही ऐकीव सांगता, आम्ही प्रत्यक्ष पाहिले आहे, अनुभवले आहे, या शब्दांना व्यवहारिक भाषेतही जोर आहे. 'हरि पाहिला रे हरि पाहिला रे । सबाह्य अभ्यंतरी अवघा व्यापक मुरारी ।।' या शब्दात अगर 'देखिला देखिला माये देवाचा देव । फिटला संदेह निमाले दुजेपण ।।' या वचनात श्रीज्ञानेश्वर माऊली हरि पाहिल्याचा प्रत्यक्ष पुरावाच उपलब्ध करते. 'भाग्य आले संतजन । झाले देवाचे दर्शन ।।' या शब्दात श्रीसमर्थ आणि 'धन्य धन्य सद्गुरूराव । माझे देही दाविला देव ।।' या पंक्तीत श्रीमुक्ताबाई देव पाहिल्याचा निर्वाळा देतात. देव पाहता पाहता पाहणाराच देव होतो हे अनुभवाने श्रीतुकोबाराय स्पष्ट करतात. 'देव पहावया गेलो । तव तो अंगे देवचि झालो ।।' हेच त्याचे गमक आहे. 'डोळा तो गगन नाद तोचि कान । शब्दाचे स्फुरण जिव्हारूप ।।' या उक्तीप्रमाणे येथे आकाश आणि त्यात घुमणारा संघाताविना अनहत याचे ऐक्य झाल्याने एकांताची प्रचिती येते. 'एक असे आत्मा ज्यात आदि अंत । तो स्वये एकांत ओळखावा ।।' या श्रीरामपाठातील श्रीमामांचे सिद्धांताप्रमाणे आत्मत्त्वाने

आत्म्याचा अनुभव साधक घेतो. हे आत्मत्त्व म्हणजे आत्मतत्त्वाचा स्पर्श घडवणे. काय तो एकांताचा आनंद असेल? असा प्रश्न आहे. एकांतात हरि अनुभवला तर लोकांतातच काय, देहत्यागा अंती हरि हा प्रत्ययकारी ठरतो. 'हरि बोला एकांती हरि बोला लोकांती । देहत्यागा अंती हरि बोला ।।' हे श्रीएकनाथमहाराजांचे बोल मोठे चिंतनीय आहेत. 'एकांत बाणला ज्याला । त्याला साधे हळु हळु ।।' असे समर्थ सांगतात. तर 'बहु एकांतावरी प्रीती । जया जनपदाची खंती । जाण मनुष्याकारे मूर्ती । ज्ञानाची तो ।।' असे एकांताचे महत्त्व श्रीज्ञानोबा माऊली आपले शब्दात प्रगट करतात. तर 'घडे एकांताचा वास । तरीच नाश या संबंधाचा ।।' या शब्दात श्रीतुकोबाराय या देहसंबंधाचा निरास निर्दिष्ट करतात.

या ठिकाणी चैतन्याची वीज सळसळून गेली तो चित्त तद्रुपच होऊन राहिले. 'चल जाऊ सख्या खेळाया । जेथे वीज चमकते ।।' या पद्यात जेथे वीज चमकते, तेथेच साधनेचा खेळ आहे असे श्रीपंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांचे अधिकारी शिष्य श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर सांगतात. 'वीज माथा चमकली । नेत्र बाहुली हासली ।।' असा साक्षात्कार श्रीमुक्ताबाई आपले अभंगवाणीत व्यक्त करतात. म्हणून या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात 'वीज सळसळोनी गेली । चित्तवृत्ती तल्लीन झाली ।।' असे दृश्य आहे. 'वीज झमकली झमकली । सद्गुरूंची किल्ली ।।१।। आहे तेज प्रकाशले । अंतर बाहेर प्रगटले ।।२।। चित्ताचे चांदणे । पाहता मन हे चाकाटणे ।।३।। रंग भरला दोही डोळा । दास म्हणे गुरूची लीला ।।४।।' या अभंगात यासाठी साक्षात्काराचा रंग आमचे श्रीमामा सूचित करतात. सद्गुरूच्या अनुग्रहाने इडा पिंगला गती स्थिरावल्या की साधकास हा प्रत्यय येतो. यादृष्टीने 'अनुग्रहाची हे पीडा । बंद पिंगला आणि इडा ।।३।।' असे नमूद केले असून या परमार्थातील सूत्र श्रीहनुमंत सद्‌गुरूंनी सांगितल्याचे सांगितले आहे. म्हणून या अभंगाचे शेवटच्या कडव्यात, 'दासरामी हनुमंत । गूज सांगे परमार्थ ।।४।।' असे म्हटले आहे.

## अभंग ९

महाथोर तरी मृत्युपंथे गेले । इतर जन्मले आणि मेले ।।१।।
मज याचा अर्थ सांगा हो समर्थ । मग हो किमर्थ चिंता नुरे ।।२।।
आकाशमार्गी चिन्मयाचा पंथ । जाणती समर्थ गुप्तपणे ।।३।।
गुप्त ते अलिप्त अलिप्त ते गुप्त । *दासरामी* हेत गुरूनाम ।।४।।

महाथोर पुरूष हे, मृत्युपंथेच आपल्या जीवनाचे, मार्गाचे आक्रमण संक्रमक वृत्तीचे संयमी, स्थायी भावाने संक्रमण करून, मृत्यूवरच विजय मिळवितात आणि खऱ्या अर्थाने स्वकीर्तीने चिरकाल अमर होऊन राहतात. 'महाथोर ते मृत्युपंथेचि गेले । किती एक ते जन्मले आणि मेले ।।' असे श्रीसमर्थांनी आपले मनाचे श्लोकात सांगून जीवमात्राला एक नवीच दिशा दाखवून दिली आहे. रोज जे आपला मृत्यू आपल्या डोळ्याने पाहतात, व मृत्यू हा देहाला आहे, आत्म्याला नाही हे जाणून त्यास सामोरे जातात, त्यांचे या लोकी असणारे वजन शरीराचे नव्हे, बुद्धिमत्तेचे. ते कधी घटतच नाही, हे ध्यानी घेणेसारखे आहे. आमच्या केळकर कुळापैकी साहित्य सम्राट न. चि. केळकर तथा तात्यासाहेब हे अशापैकीच एक महापुरूष होते. केळकर म्हणून वर्णन करतो असे नव्हे. ते लो. टिळकांचे कट्टर लोकमान्य अनुयायी असून, केसरीचे संपादक आणि सिद्धहस्त लेखक, साहित्यसम्राट असून प्रज्ञावंत अभिजात कवी होते. त्यांचे लेख शाळा, विद्यालयातून फार काय, महाविद्यालयाचे क्रमिक पुस्तकातून अभ्यासक्रमात येत. असा त्यांचा साहित्यात सिंहाचा वाटा होता. अंतसमयी त्यांना मृत्यू समोर दिसत होता. 'ये मृत्यो तू जरूर ये, तुझे स्वागत करून तुला हस्तांदोलन करण्यात मला आनंद आहे.' अशा

अर्थाचे त्यावेळचे श्रीतात्यासाहेबांचे अमर काव्य प्रतिभासंपन्न असून, ते लिहून नाकावरील चष्मा आणि टाक टेबलावर म्हणजे मेजवर ठेवला आणि त्यांनी इहलोकीचा अखेर निरोप घेतला. ही गोष्ट तशी सामान्य नव्हे. ते एक विज्ञानाला आणि वास्तव बुद्धिवाद्यांना आव्हानच आहे असे म्हणणेच संयुक्तिक होईल, इष्ट होईल. सावित्रीने पुराणकाळात सत्यवान पतीचे बाबतीत, हाच सिद्धांत पुराणकाळी प्रस्थापित करून, आपले नाव आदर्श पतिव्रता गृहिणी म्हणून, मृत्यूवरही जय मिळवून, अगदी प्रेमाने मात करून, हजारो वर्षे वटपौर्णिमेस ती सर्वत्र पूजाच घेत आली आहे. प्रपंच आदर्श होण्यास पत्नी पतीचे सहमत कसे सर्वश्रेष्ठ आहे आणि यात स्त्रियांना किती मानाचे स्थान आमच्या प्राचीन संस्कृतीत आहे, आचार हीच एक कशी तपस्या आहे, मृत्यू ही कल्पना नसून ती एक कशी विशाल सत्ता आहे इत्यादी अनेक गोष्टींवर सावित्रीने प्रकाश पाडला आहे. आकाशमार्गे परलोकात कसा प्रवेश होतो? तसेच परकाया प्रवेश हा जीवाला कसा शक्य होतो? गेलेला जीव शरीरात प्रविष्ट होईल तर त्याची कशी पुनःश्च हालचाल होते? आणि शरीराबाहेर गेलेला जीव, शरीर हे एक आपले मढे आहे म्हणून कौतुकाने कसे पहातो? आणि या पद्धतीने गुरूपदिष्ट मार्गाने आपण जीवंत असताही, शरीराकडे याच पद्धतीने पाहून आत्मबुद्धीने शरीरावर आणि त्याद्वारा मृत्यूवर कसा विजयच मिळविता येतो? काळाचे सार्थक साधनेने झाले तर, काळही कसा आज्ञांकित होतो? अशा प्रायोगिक पद्धतीने, क्रमशः जीवनातील अवस्था दाखवून, अवस्थांतराने कितीप्रकारे हे विश्व नटलेले आहे, हे सिद्ध केले आहे. सर्व संतांनी आपल्या उपासना पद्धतीने हा अमर संदेश दिला आहे. स्थलाभावास्तव सर्व संतांचा विचार येथे अशक्यप्राय आहे. भगवान श्रीरामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, रामतीर्थ, रमणमहर्षी, भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी हा संदेश आपल्या कृतीने मानवी

जीवनात आदर्श म्हणून अंतर्मुख जीवासाठी जागता ठेवला आहे. या उलट जे देहाकार जीव आहेत, ते मात्र जन्मले आणि मेले असेच होत राहिले आहे. सारेच मग करमरकर आहेत. कर - मर - कर या तीन शब्दातच त्यांचे जीवन स्पष्ट होत आहे. आणि म्हणून तर या पहिल्या अभंगाचे प्रथम कडव्यात 'महाथोर तरी मृत्युपंथे गेले । इतर जन्मले आणि मेले ।।१।।' असे प्रस्तुत केले आहे. येथे जन्ममरण देहाला आहे, आत्म्याला नाही. हेच अभिप्रेत आहे.

'मज याचा अर्थ सांगा हो समर्थ । मग हो किमर्थ चिंता नुरे ।।२।।' या दुसऱ्या कडव्यातील पंक्तीप्रमाणे हे ज्ञान शब्दाने होणे आणि समर्थ कृपेने समर्थपणे प्रत्ययास येणे यात महदंतर आहे. म्हणून याचा प्रत्ययकारी अर्थ सांगा की, ज्याने ही मृत्यूची चिंताच उरणार नाही, या पूर्ण श्रद्धेने श्रीसमर्थांचीच मनोभावे प्रार्थना केली आहे.

या चैतन्यमार्गाचे आक्रमण आकाशमार्गाने होते. 'आकाशमार्गी गुप्तपंथ । जाणती योगी ये समर्थ । इतरासी हा गुह्यार्थ । सहसा न वचे ।।' या ओवीत आकाशमार्ग स्पष्ट केला आहे. समर्थांचे या ओवीप्रमाणे हा मार्ग श्रीसमर्थ किंवा जे कोणी अधिकाराने समर्थ असतात, ते जाणू शकतात. आमचे भगवान सद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज किंवा चिमडचे महाराज यांना आमचे संप्रदायात समर्थ म्हणतात. श्रीभाऊसाहेबमहाराज यांचा जन्म समर्थांप्रमाणे श्रीरामनवमीस झाल्याने त्यांनाही समर्थ म्हणतात. हा जो मार्ग आहे, याची वाटचाल यौगिक पद्धतीने होते. यादृष्टीने त्याचे रहस्य 'आकाशातुनी वाट रे । न करावा बोभाट रे । सांडुनी तीनशेसाठ प्राण्या । घे वरचा एकसष्ठ रे ।।' या पद्यात श्रीचिमडचे महाराजांनी उलगडले आहे. 'साठावरची कळ लाधलो । शिव शिव चिंतने शिवची झालो । गोपालनाथ पायी विनटलो । अवघे तू मी ।।' या शब्दात साठावरील कळ म्हणजे वर्म हे श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे अधिकारी

चुलत बंधू श्रीगोपाळकाका कोटणीस यांनी निर्दिष्ट केले आहे. हा सर्व विचार पाहता मूळ अभंगाचे तिसऱ्या कडव्यात 'आकाशमार्गी चिन्मयाचा पंथ । जाणती समर्थ गुप्तपणे ।।३।।' असे म्हटले आहे.

'या उपाधीमाजी गुप्त । चैतन्य जे सर्वगत । ते तत्त्वज्ञ संत । स्वीकारती ।।' या श्रीज्ञानेशोक्तीप्रमाणे गुरू असणाऱ्या चैतन्याशी समरस झालेले अध्यात्माधिकारी समर्थ संत गुप्तपणे अलिप्त असतात. ते असताना प्रगट होत नाहीत. नंतर सर्वांना हळूहळू कळू लागतात. म्हणून या अभंगाचे शेवटचे कडव्यात 'गुप्त ते अलिप्त अलिप्त ते गुप्त । दासरामी हेत गुरूनाम ।।४।।' असे नमूद केले आहे.

✻✻✻

## अभंग १०

आजी हा उजेड आला माझे नयनी । पाहू तरी कोणी काय सांगे ।।१।।
उजेडात नाही अंधाराची वार्ता । ऐसी असे कथा भूगोलाची ।।२।।
अंधार उजेड उजेड अंधार । भरे धुंधुकार आत्मतेज ।।३।।
*दासरामी* झाला आनंद बघा । तोचि तो सेवावा सर्वकाळ ।।४।।

अंधारात उजेड झाला हाच तो आत्मसाक्षात्कार. याबद्दल कोण काय सांगते पाहू तरी! 'अंधारात पाहता उजेड दिसतो । हर्ष बहु होतो मनामाजी ।।' असे श्रीतुकोपनिषद सांगते. 'गपकन अंधार पडला बाई झपकन उजाडले । चंद्रसूर्य नसता तेथे तेज प्रकाशले ।।' या श्रीशिवरामांचे उक्तीप्रमाणे तसेच भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे वचनांमृताप्रमाणे 'डोळे, कान, नाक, तोंड' बंदच झाल्याने, गप्प होताच जे शून्य दृष्टीसमोर आले, त्या अवस्थांतरात म्हणजे, अंधारात उजेड दिसताच मनाला हर्ष झाला असे श्रीतुकाराममहाराज म्हणतात. शब्दाशब्दांचा ग्रास झाला तर तेथे अंधारच आहे. तेथे एकदा का चैतन्याचा प्रकाश पडला की, मग अंधाराची वार्ताच नाही असे होते. 'भूमन' या उपनिषदातील शब्दाप्रमाणे भू + मन इति भूमिती आहे. 'भू' ला आणि 'मना'ला मिती म्हणजे प्रमाण आहे. मनाने भूभाग आणि भूभागाने मनोविचारांचा स्पंद अशीच ती एक प्रणाली आहे. मनोलयाने आनंद होतो हा 'भूमन' आनंद किंवा भौमानंद आहे. चैतन्याचे प्रकाशात अंधार गावीही येत नाही अशी या भूगोलाची कथा आहे. चैतन्य गोलातूनच सारा भूगोल हा गोलाकार झाला आहे. हा गोल आपल्या डोळ्यासमोर सतत राहून, तोच एक गोल म्हणजे जीवाचे उद्दिष्ट झाले पाहिजे. उजेड अंधार, अंधार-उजेड होता होता त्यात आत्मतेज सर्वत्र भरून रहाते. 'इडा पिंगलेचा ओघ सैरा दिसे । त्यासी प्रकाशे आत्मतेज।।' या श्रीज्ञानोबांचे सिद्धांताप्रमाणे प्रत्ययकारी अवस्था जीवनात प्राप्त होते. मग सारा आनंदच होतो व तोच तो सर्वकाळ सेवावा असे वाटत रहाते. हाच सर्व आशय मूळच्या दहाव्या अभंगात यथाक्रम दर्शविला आहे. असे स्पष्टपणे दिसून येईल हे स्पष्ट आहे.

## अभंग ११

सावल्यांचा खेळ सावल्या खेळती । परी कोणा चित्ती उमगेना ।।१।।
विश्वपट सारा प्रकाशाने दिसे । प्रकाश गवसे कोण्यापरी ।।२।।
अंधारात पहाता दिसतो उजेड । जया नाही जोड जगामाजी ।।३।।
चंद्रसूर्य लुप्त होता साक्षात्कार । दावी गुरूवर *दासरामा* ।।४।।

स्वरूपाचे ज्ञानाने सावली काय आहे ते कळले तर, सावली ही सावली आहे हे ज्ञान झाल्याने स्वरूप साक्षात्कार होतो. आज आहे, उद्या नाही, काल नाही, पण आज आहे आणि आहे पण नेम नाही व नेम नाही पण आहे, याचे नावच सावली व आहेच आहे, असे म्हटले तरी आहे व नाही म्हटले तरी, आहे याहीवर आहे नाही, ही सापेक्षता जेथे नाहीच, तेथे आहे ते आहे. म्हणून दृग्गोचर होणारे स्वरूप आहे. जो आपली सावली पहातो, डोळ्यातील बाहुली पहातो, किंवा कवडश्यातील अणूरेणू पकडण्याच्या उद्योगात असतो, तो महापुरूष आत्मनिष्ठ समजावा इतके त्याचे महत्त्व आहे. 'ब्रह्मभूत दिसे डोळ्यातील बाहुली' हे श्रीतुकोपनिषद येथे चिंतनीय आहे. सावली ही सावलीच. तो एक भास आहे, हे ज्याला कळले, त्याची देहबुद्धी अस्तित्व धरू शकत नाही किंवा देहबुद्धीने आत्मबुद्धी करावी हे समर्थ वचन समर्थपणे त्याने आत्मसात केल्याने, सांगावे लागत नाही ही अवस्था गुरूकृपेने साधणे, हे तर अगत्याचे आहे. यासाठी सज्जनांची संगती सतत राहिली पाहिजे. म्हणून 'सदा संगती सज्जनाची धरावी' असे श्रीसमर्थ आपले मनोबोधात तळमळीने सांगत आहेत. 'अभ्राची सावली धरोनिया हाती । निघे तो एकांती निवृत्तीदेव ।।' या श्रीचांगदेवांचे वचनाप्रमाणे श्रीनिवृत्तीनाथांनी अभ्राची सावली

हाती धरून एकांतात प्रवेश केला होता. चैतन्याच्या ठिकाणी प्रवाही होणारे वारे ज्या माध्यमातून वहाते ते फक्त आहे व त्याची सावली ही मरणरूप प्रकृती आहे. त्यात जन्म ही विकृती आहे. मग हे शरीर हे तरी त्या सावलीची एक सावली आहे, असे म्हणण्याशिवाय गत्यंतरच नाही. छाया, आडछाया, पडछाया या त्रिविधक्रमांनी या सावलीचा निर्देश करता येईल. म्हणून चित्रविचित्रमय जगत हा साऱ्या विश्वात्मक प्राणीमात्रांचा होणारा एक सावल्यांचा खेळ आहे, हे स्पष्ट होईल. सावल्यांचा खेळ हा सावल्याच खेळत आहेत. हे तर त्यातील इंगित आहे आणि ते तर खरे धरूनच आपण चाललो आहोत. म्हणून द्वंद्वाशी झगडत रहाण्याचा प्रसंग अटळ होवून राहिला आहे. हे जीवन कलहास प्रवृत्त करते म्हणून तर त्याला जीवनकलह असे ज्ञानी म्हणतात. जीवन म्हणजे कलह या तीन अक्षरातच सामावलेले दिसून येते. सावल्यांचा खेळ ज्ञात झाला तर तो द्वंद्वातीत होतो. म्हणून श्रीज्ञानेश्वरमहाराज म्हणतात, 'सुखी संतोषा न यावे । दुःखी विषादा न भजावे । लाभालाभ न धरावे । मनामाजी ।।'

'समः शत्रौच मित्रेच । लाभा लाभौ जया जयौ ।।' अशी त्याची अवस्था होते. 'सुखदुःखाची आभाळे । येती जाती आपुल्या काळे ।।' या श्रीतुकोबारायांचे शब्दांची महती स्पष्ट होते. 'गगनीचा घन जातो पै वाटेन । अवचिता पतन अधोपंथे ।।' या संतोक्तीप्रमाणे चिद्‌वायु आकाशातील म्हणजे चिदाकाशातील चिद्‌घन हा वाऱ्याने इतस्ततः होत असता, वाऱ्याने आडवल्याने तेथेच कोसळतो, गुरूकृपेचा वर्षाव होतो. 'मेघवृष्टीने करावा उपदेश' या चरणाप्रमाणे चैतन्यधारा बरसू लागतात आणि जीवन कृतार्थ होते, उजळून निघते.

श्रीचिमडचे श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर हे सांगलीला त्यांचे शिष्य श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे घरी, त्यांचे निर्वाणापूर्वी आलेले असताना, बाबासाहेबांनी महाराजांचे छायाचित्र घेण्याची इच्छा प्रदर्शित

केली आणि महाराजांचे नुकतेच अनुग्रहीत झालेले व देव डॉक्टर म्हणून पुढे प्रसिद्धीस आलेले ख्यातनाम श्री. विष्णुपंत आपटे यांनी फोटो घेण्याचा प्रयत्नही केला. पण महाराज आधीच बोलले होते की, 'बाबानो, तुम्ही माझे छायाचित्र कसे घेणार? मी तरी शरीराचेपेक्षा निराळाच आहे. शरीर ही माझी सावली म्हणजे छाया आहे. मग त्या छायेचे छायाचित्र काढून, त्यात तुम्हाला काय मिळणार? तेव्हा तुम्ही छायाचित्र घेऊ नका.' पण अंतरीच्या ओढीने विष्णुपंतांनी छायाचित्र घेण्याचा प्रयत्न केलाच. महाराजांचे ऐकायचे नाही, हा त्यात हेतू नव्हता, तर पूजेला छायाचित्र असावे अशी तळमळ होती. पण गम्मत अशी की छायाचित्र घेताना, ५-६ वेळा काचा फुटल्या आणि श्री. विष्णुपंतांनी आणि श्री. बाबासाहेबांनी तो नाद सोडला आणि महाराजांचे पवित्र चरणकमली नतमस्तक होऊन नेत्रातील प्रेमाश्रूंनी अक्षरशः अभिषेक केला. पंचामृतानी नव्हे. काय महाराजांचा अधिकार? त्यांनी हा सावल्यांचा खेळ श्री. बाबासाहेबांना आणि श्री. विष्णुपंतांना आपल्या कृपेने दाखविला. श्रीअक्कलकोट स्वामी यांनी छायाचित्र घेऊ नका असे म्हटले तर ते प्रयत्न करूनही निघाले नाही. भक्तांचे प्रेमाने एकदा काय घेता तर घ्या म्हणाले, आणि आश्चर्य तेवढेच निघाले. हा वृत्तांत साराच पुण्यातील संत चरित्रकार श्री. फडके यांनी श्रीअक्कलकोट स्वामींचे चरित्रात श्रीचिमडमहाराजांचे सह उत्कृष्टपणे दिला असून, त्याचा उल्लेख संतकृपेने श्रीचिमडमहाराज यांचे चरित्र प्रकाशित केले असून, त्यात डॉ. केशव वामन आपटे यांनी ग्रथित केला असून, फार बोलका आहे. 'माझे छायाचित्र घेऊ नका' असे बुधगावचे गुंडुबुवा म्हणाले, पण प्रयत्न करूनही निघाले नाही. व ज्याला बाबा तू घेणार तर घे म्हणाले, त्या श्री. जप्तीवाल्यांना मात्र श्रीगुंडुबुवांचे छायाचित्र घेण्याचे भाग्य लाभले. म्हणून हा सावल्यांचा खेळ पहाणारे संतमहात्मे यांची छायाचित्रे लाभणे ही तर भाग्याचीच गोष्ट म्हटली पाहिजे. भगवान

रामकृष्ण परमहंस यांचे ९० वर्षांखाली बंगाल येथे निघालेले दुर्मिळ छायाचित्र याची प्रतही आज उपलब्ध नाही. असे ते छायाचित्र नाशिकचे प.पू.श्रीविष्णुजी क्षीरसागर विद्यावाचस्पती यांनी मला गतवर्षीच मोठ्या भक्तीप्रेमाने भेट म्हणून दिले आणि यावर्षी भगवान रामकृष्णांनी मजपुढे प्रगट होऊन हे संजीवन पाठाचे अभंग मला श्रुत केले. या गोष्टीने संतांचे छायाचित्राचे महत्व अधिकच स्पष्ट होत आहे. पुरीचे जगद्गुरू श्रीशंकराचार्य यांनी ज्यांना 'देवतास्वरूप' या शब्दाने उल्लेखिले, त्या देवतास्वरूप श्रीअम्माजी अदिलाबादहून येथे केवळ मजसाठी, माझी भेट घेणेस आल्या, यामागे वर उधृत केलेले रहस्यच रहस्यमय आहे, असे दिसून येईल. माझ्या आनंदाला तर पारावारच राहिला नाही. यापेक्षा काय सांगावे? म्हणून या मूळ अभंगाच्या पहिल्या कडव्यात 'सावल्यांचा खेळ सावल्या खेळती । परी कोणा चित्ती उमगेना ।।१।।' असे म्हटले आहे. आता हे सारे विश्व आणि यात घडणारा सावल्यांचा, आंधळ्या कोशिंबीरीचा खेळ, आत्मप्रकाशाने प्रतीत होत आहे. सिनेमासृष्टीत मध्यंतरात उजेड व आरंभी आणि नंतर अंधारात पडद्यावरील खेळ पहावा लागतो. तेथे आरंभी व शेवटी अंधार असून, परमात्म्याचे साम्राज्यात सारी गडबड मध्यंतरात आहे हे एक ध्यानात घेण्यासारखे आहे. यात जर कोणी गडबडला, तर मग तो गडबडलाच म्हणून समजावे. त्याला आत्मसाक्षात्कार होणे शक्य नाही. मग आत्मसमाधान कोठचे? असा प्रश्न आहे. 'आरंभ नाही शेवट कैचा मध्यस्थितीला भुलू नको । संसारामधी एकही पाऊल अनुभवावीणे टाकू नको ।।' हे श्रीदत्तावतार पंतमहाराज बाळेकुंद्रीकर यांचे पद्यातील अवतरण चिंतनाने चैतन्याचे अवतरण घडविणारे आहे. या सर्वदृष्टीने या अभंगाचे दुसऱ्या कडव्यात 'विश्वपट सारा प्रकाशाने दिसे । प्रकाश गवसे कोण्यापरी ।।२।।' असे म्हटले आहे. आत्मप्रकाशाने हे विश्व प्रकाशित असून, त्यात सावल्या प्रतीत होत आहेत. या ज्ञानाने

आत्मप्रकाश प्रतीत होऊन साधकास अंतिम समाधान लाभते, हे उघड आहे. ‘सूत्रे मणी ......’ या न्यायाने ‘विश्वपट ब्रह्म दोरा । ताटी उघडा ज्ञानेश्वरा ।।’ हे श्रीमुक्ताबाईंचे बोलच महत्त्वपूर्ण आहेत. ब्रह्मतंतूतूनच विश्वपट प्रकाशित आहे. अंधारात उजेड हा आत्मसाक्षात्कार. या सूत्राप्रमाणे ‘अंधारात पहाता दिसतो उजेड । जया नाही जोड जगामाजी ।।३।।’ असे अभंगाचे तिसऱ्या कडव्यात ग्रथीत केले आहे. या प्रकाशाला जगात जोड नाही. हा प्रकाश स्वयंपूर्ण आहे. ‘आपेआप प्रकाशले तेणे आनंदे राहे ।’ हे श्रीमुकुंदराज यांचे वचन येथे शिरोधार्य आहे.

चंद्रसूर्य लुप्त होताच हा साक्षात्कार घडतो. ‘सोहिरा म्हणे ज्ञानज्योती । तेथे कैची दिवसराती । तयावीण नेत्रपाती । हालवू नको रे ।। हरिभजनावीण काळ घालवू नको रे ।।’ हे महापुरूष श्रीसोहीरोबानाथ यांचे वचन सतत उरी बाळगावे असे अमोलिक आहे. याला अनुलक्षून या अभंगाचे चौथ्या कडव्यात ‘चंद्रसूर्य लुप्त होता साक्षात्कार । दावी गुरूवर दासरामा ।।४।।’ असे सांगितले आहे.

***

## अभंग १२

चतुराक्षरी हा असे गुरूमंत्र । परी त्याचे तंत्र ओळखावे ।।१।।
जो का परतंत्र त्यासी नाकळे । स्वतंत्र आकळे होता चित्ते ।।२।।
सकारी हकार हकारी सकार । भरले साचार सर्वघटी ।।३।।
*दासराम* तेथे होताचि निमग्न । उरला पवन पवनेची ।।४।।

हा मंत्र तरी चतुराक्षरी आहे. चतुराला अक्षरी गवसणारा गुरुमंत्र अक्षररूप अविनाश आहे. पण त्याचे तंत्र ओळखता आले पाहिजे. परप्रकृतीच्या तंत्राने जो परतंत्र जीव, त्याला याचे आकलन होणारे नाही. पण, 'स्व' काय आहे हे जाणून त्याचे तंत्राने वागणारा जीव जर खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाला तर त्यालाच हे मंत्रज्ञान होते. 'नमना एवढा मंत्र । नाही नाही धुंडिता शास्त्र । विचार लक्षण पात्र । तेची जाणे येथिचे ।।' या श्रीज्ञानदेव नमनस्तोत्रात मनाचे मनत्त्व नाहीसे करण्याचे सामर्थ्य ज्यात आहे, अशा नमनापरता मंत्र नाही, असा स्पष्ट उल्लेख आहे. 'एका जनार्दनी नमन । मन केले त्या आधीन ।।' या सूत्राप्रमाणे मन सर्वस्वी गुरूपदी समर्पित होणे हेच ते नमन आहे. कारण मन मिळाले तरच हे घडते. म्हणजे, 'मन मिळालेसे मना । एका भुलला जनार्दना ।।' असे श्रीएकनाथमहाराज, गुरूकृपेची भूल पडली तरच मनाला मन मिळते असे रहस्य प्रगट करतात. सकारातून हकार व हकारातून सकार हा सतत घोषित होतो. याने सर्व घट व्यापले आहेत असे त्याचे महत्त्व आहे. 'सर्वाघटी राम देहादेही एक । सूर्यप्रकाशक सहस्ररश्मी ।।' हे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे हरिपाठातील वचन मोठे चिंतनीय आहे. 'धरिता सो टाकिता हं । अखंड चाले सोहं सोहं ।।' या श्रीसमर्थ वाक्याप्रमाणे हे सोहंसूत्र सर्वव्याप्त आहे. या ठिकाणी निमग्न होताच, पवनाशिवाय दुसरे काही शिल्लकच रहात नाही. हा सर्व आशय वरील बाराव्या अभंगात चार कडव्यात स्पष्ट झाला आहे. यावरून येथे काय अभिप्रेत आहे ते स्पष्ट होईल असे वाटते.

## अभंग १३

करुनी दावी तरी । त्याचे पाय जीवी धरी ।।१।।
सांगताती तुकाराम । त्याचे ओळखावे वर्म ।।२।।
बोले तैसा चाले । यात सर्व काही आले ।।३।।
चाले तैसा बोले । हेचि मनी घ्यावे भले ।।४।।
*दासरामी* खूण । दावीतसे हनुमान ।।५।।

परमार्थ हा एक कृतीपाठ आहे. यादृष्टीने लाख बोलण्यापेक्षा काही एक का होईना पण करून दाखवावे, ते खरे महत्त्वाचे आहे. बोलेल ते करेल काय? व गर्जेल ते पडेल काय? ही म्हण देखील अर्थपूर्ण आहे. क्रियेवीण जी वाचा उरली तीच वाचाळता अगदी व्यर्थ आहे. म्हणून तर 'क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे' असे श्रीसमर्थ ठणकावून सांगतात तसेच 'केल्याने होत आहे रे, आधि केलेची पाहिजे' असेही बजावतात. तर 'केले होते याचि जन्मे । अवघ्या विठोबाच्या नामे । तुका म्हणे कर्मे । जाळोनिया तरसी ।।' असे श्रीतुकोपनिषद या कृतीपाठाने काय होईल याचा निर्वाळा देते. 'तुका म्हणे करूनी दावी । त्याचे पाय माझे जीवी ।' इतके माणसाने करून दाखविले तर श्रीसंत तुकोबारायांना त्याचे महत्त्व असून, 'तुका म्हणे ऐसी मात । करूनी दावी तोचि संत ।।' या शब्दात श्रीतुकाराममहाराज अशा जीवाला संत म्हणतात. श्रीरामानंदमहाराज खटावकर आपले प्रवचनातून हा चरण वारंवार म्हणून त्याचे महत्त्व स्पष्ट करून दाखवीत असत. म्हणूनच मुळातील अभंगात 'करूनी दावी तरी । त्याचे पाय जीवी धरी ।।१।। सांगताती तुकाराम । त्याचे ओळखावे वर्म ।।२।।' असे म्हटले आहे.

बोलल्याप्रमाणे चालणे यातच सारे अध्यात्म सामावलेले आहे. 'यथा चित्त तथा वाचा । यथा वाचा तथा क्रिया ।।' चित्ते, वाचे, क्रिया

यांचा 'साधुनामेकरूपता', जे चित्तात तेच वाचेत आणि क्रियेत असणाराच खरा साधु असे सुभाषितकार म्हणतात. पांडव किती? बाजल्याच्या खुरा इतके तीन असे म्हणत, बोटे दोन दाखवून धडधडीत खोटे बोलून खऱ्याचा आव आणणे याला व्यवहारातही किंमत नाही, मग परमार्थातर बोलावयासच नको. 'बोले तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले ।।१।। त्याचे झाडीन अंगण । अंगे दास्यत्त्व करीन ।।२।।' असे श्रीतुकाराममहाराज आपल्या अभंगात बोलण्याप्रमाणे वागण्याचे महत्त्व काय आहे हेच प्रतिपादन करतात. याचा सरळ सरळ अर्थ असा की, बोलण्याप्रमाणे वागण्यातच सर्व काही आले आहे, मग वेगळा परमार्थ उरलाच नाही. याच दृष्टीने मूळ अभंगाचे तिसऱ्या आणि चौथ्या कडव्यात 'बोले तैसा चाले । यात सर्व काही आले ।।३।। चाले तैसा बोले । हेचि मनी घ्यावे भले ।।४।।' बोले तैसा चाले म्हणजे चाले तैसा बोले. हेच मनी होणे आवश्यक आहे. 'आधी राखावा आचार । मग पहावा विचार । आचारे विचारे पैलपार । पाविजेल ।।' हे श्रीसमर्थ अवतरण मोठे चिंतनीय आहे. संत आपला आचारच, मग विचारातून प्रगट करतात. आधि विचार, मग विचार असेल तर तेथे गैरमेळ कधीही होणार नाही. मग त्या शब्दांना किंमत आहे, जोर आहे. त्या शब्दात खरे सामर्थ्य आहे. आपणच कधी जे केलेच नाही, ते आपण सांगून ऐकणार तरी कोण? असा प्रश्न आहे. श्रीमहंमद पैगंबर यांनी स्वतः गूळ सोडला आणि सारखा गूळ खाणाऱ्या त्याचे आईचे विनंतीवरून, 'गूळ खाणे चांगले नाही, तू सोडून दे' म्हणून सांगताच त्याने तो सोडला, याचे यातच रहस्य आहे. भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज हे याच तत्त्वाचे मूर्तिमंत उदाहरण असल्याने ते खरे भगवानच आहे, त्यांनी हीच खूण दासरामास दाखवावी म्हणून 'दासरामी खूण । दावीतसे हनुमान ।।५।।' असे या अभंगाचे शेवटच्या कडव्यात नमूद केले आहे.

***

## अभंग १४

काना मात्रा असे । केशव तो सर्वी दिसे ।।१।।
काना मात्रा वजा जाता । मग शव येई हाता ।।२।।
*दासरामी* नाम । मग नुरेचि संभ्रम ।।३।।

काना मात्रा असणारा केशव हा सर्वव्याप्त आहे. 'केशवाचे ध्यान धरोनी अंतरी । मृत्तिकेमाझारी नाचतसे ।।१।। विठ्ठल विठ्ठल स्मरे वेळोवेळा नेत्री वाहे जळ सद्गतीत ।।२।। कुलालाचे वंशी जन्मले शरीर । गोरा तो कुंभार हरिभक्त ।।३।।' या संतश्रेष्ठ श्रीगोरोबा कुंभारांचे अभंगावरून केशव नामाची व त्याचे स्वरूपाची महती सहजपणे स्पष्ट होत आहे. आपल्या संधेतील आचमनात पहिलेच नाम केशवाचे आहे. संध्या ही एक साक्षात्कार घडविणारी उपासना आहे. सूर्योपासना किंवा प्राणोपासना आहे. सूर्याचे तेज बुद्धीत प्रविष्ट होऊन तो जीव मोठा प्रभावी व साक्षात्कारी होतो, असे याचे सामर्थ्य आहे. 'स्वसाक्षात्कारेण अविद्या शक्ति दाहकृत' असे श्रीमान परमहंस परिव्राजकाचार्य जगद्गुरू श्रीशंकराचार्य यांनी गायत्री मंत्रावरील 'भर्ग' या शब्दावर टीका करताना म्हटले आहे. 'अरे संध्या राहूदे, निदान आचमन तरी न चुकता कर' असे पूर्वी मोठी माणसे लहान मुलांना म्हणत असत. म्हणून काना मात्रा ओळखून, केशवाचे नाम न चुकता घेणे अत्यावश्यक आहे. प.पू. योगीराज गुळवणीमहाराज यांचे सांप्रदायात संध्येला फार मोठे महत्त्व आहे. आयुष्यातील शेवटच्या दिवसापर्यंत श्रीगुळवणीमहाराज यांची संध्या कधीच अंतरली नाही हे ध्यानी घेण्यासारखे आहे. भगवान रामकृष्ण परमहंस हे स्वतः संध्या करीत असत. या उपासनेवर त्यांचा मोठा भर होता. त्यांची संध्या थोडक्यात पण महत्त्वपूर्ण अशी होती. श्रीअंबुरावमहाराज, श्रीचिमडचे नारायणमहाराज, माझे पितृदेव श्रीमामा केळकर हे संध्या करीत. पाणी न घेता नामाची ही संध्या चालूच आहे. या केशव नामाचे व रूपाचे महत्त्व या अभंगाचे तीन कडव्यात ग्रथीत केले आहे, यापेक्षा काय सांगावे?

***

## अभंग १५

**खरे बोले तरी । सहजेची जोडे हरि ।।१।।**
**खरे खरे खरे । नाम देवाजीचे बरे ।।२।।**
***दासरामा* नाम । पूर्ण आनंदाचे धाम ।।३।।**

खरे बोलण्याने हरि सहजच प्राप्त होतो. म्हणून आपण खरेच बोलावे. खरे बोलण्याचे सारे खरेच होत जाते इतके खरे आहे. आपण जे केले तेच चांगले वाईट काही असो, ते खरेपणाने सांगण्याने त्यातील वाईटपणा निघून जातो आणि पुनः तसे घडू नये याची दखल जीव हा निश्चितपणे घेतो. शेवटी जे खरे ते खरे व खोटे ते खोटे होऊन खरेपणाने खरेच हाती येते, हे अगदी खरेच आहे. 'खरे बोले तरी । फुकासाठी जोडे हरि ।' हे श्रीतुकोपनिषद येथे चिंतनीय आहे. 'सत्य साच खरे । नाम विठोबाचे बरे ।' हे श्रीतुकोपनिषदही येथे चिंतनीय आहे. तीन वेळा सांगितले की तेथे शंकेला जागा रहात नाही, या अर्थाने श्रीविठ्ठलाचे नाम तेवढेच खरे आहे असे श्रीतुकाराममहाराजांनी 'सत्य साच खरे' या तीन शब्दात तीन वेळा ते खरे आहे असे ध्वनीत केले आहे. 'निजधाम हे नाम । शोक अपहारी।' या समर्थोक्तीप्रमाणे किंवा 'तुका म्हणे नाम । चैतन्य निजधाम ।' या श्रीतुकोक्तीप्रमाणे नामच खरे आनंदाचे धाम आहे. 'विश्वाचा विश्राम रे । स्वामी माझा राम रे । आनंदाचे धाम त्याचे । गाऊ वाचे राम रे ।।' असे श्रीबांदकरमहाराज यांनी आपल्या उत्कृष्ट अशा पद्यात या नामाचे गोड वर्णन केले आहे. हाच सर्व आशय या मूळच्या अभंगात वर उधृत केलेल्या तीन कडव्यात ग्रथीत केला आहे.

***

## अभंग १६

स्वरूपानंद रामानंद । ब्रह्मानंद नामानंद ।।१।।
प्रणवानंद ध्यानानंद । ऐसे पाहता आनंद ।।२।।
मनी याचा घेता बोध । *दासरामी* या आनंद ।।३।।

या अभंगात सिद्ध सत्पुरूषांचे काही नामांचा समावेश आहे. पावस येथे साक्षात श्रीज्ञानेश्वरमहाराजच कपडे बदलून स्वामी स्वरूपानंद या नावाने अवतीर्ण झाले आणि वावरले. 'स्वरूपाचा आनंद । तेचि स्वामी स्वरूपानंद ।।१।। आनंदाचे हे स्वरूप । अमलानंद निर्विकल्प ।।२।। संतांचे संगती । दासरामा आनंद किती ।।३।।' कोल्हापूर येथे श्रीमाधवनाथमहाराज सांगवडेकर यांचेकडे प.पू. श्रीविश्वनाथमहाराज रुकडीकर यांचे पुण्यतिथी महोत्सवाचे प्रसंगी मला अगत्याचे बोलावणे होते म्हणून गेलो असता, माझे निरूपण झाले. यावेळी मला 'स्वरुपाचा आनंद।' हा अभंग कीर्तनातच स्फुरला. सारे वातावरण भारावून गेले. या कीर्तनास पेणचे प.पू. स्वामी अमलानंद, परमप्रिय प्रा. म.अ.कुलकर्णी तथा स्वामी प्रज्ञानंद, त्याचप्रमाणे परमप्रिय श्रीरमणभक्त डॉ. गं. वि. कुलकर्णी तथा आबा, भाऊराव पडसलगीकर वगैरे उपस्थित होते. कीर्तनोत्तर माझी व स्वामी अमलानंदांची झालेली भेट अपूर्वच ठरली. स्वामी स्वरूपानंदांचे आदेशाप्रमाणे त्यांनी माझे गळ्यात पुष्पहार घालून दृढ आलिंगन दिले. तो प्रेमामृताचा वर्षाव तर मजवर स्वामी अमलानंद आजतागायत करीत आहेत. परमप्रिय प्रा. म.अ.कुलकर्णी यांचे भक्तीप्रेमास व श्रद्धेस तर तोडच नाही. हे लिहिल्याशिवाय माझ्याने राहवेना यातच सारे आले. निखळ स्वरूप असे स्वरूपानंद, मुकुंदराजपंथी सुप्रसिद्ध सिद्धपुरूष श्रीपाटीलमहाराज यांचे गुरू श्रीरामानंदमहाराज व श्रीब्रह्मचैतन्यमहाराज यांचे पट्ट शिष्य श्रीब्रह्मानंदमहाराज तसेच श्रीनामानंद, प.पू.श्रीविष्णूजी क्षीरसागर व देवता स्वरूप श्रीअम्माजी, आदिलाबाद या ज्यांना फार मानतात असे प.पू. स्वामी प्रणवानंद, ध्यानानंद, इत्यादी सिद्धांचा समावेश या मूळ अभंगामध्ये आहे. या बोधाने दासरामास अपार आनंद होत आहे.

## अभंग १७

रूप बैसे दृष्टी । चित्त पायी घाली मिठी ।।१।।
एक होता मनोमन । पूर्ण झाले समाधान ।।२।।
चार चार आठ । प्रेमे ओलांडिली वाट ।।३।।
एकनाथ दावी खूण । आचरोनी होती धन्य ।।४।।
*दासराम* म्हणे । सर्व सुखाचे ठेवणे ।।५।।

दृष्टीमध्ये रूपाचा साक्षात्कार झाल्याने चित्त हे पायी मिठीच घालून राहिले. 'एका जनार्दनी देखियले रूप । रूप पाहता जाहले तद्रुप ।।' या श्रीनाथोक्तीप्रमाणे रूप पाहता तद्रुपताच होते. 'चित्त बैसे पायी । रूप बैसे डोळा । जीवी कळवळा । आवडीचा ।।' हे श्रीतुकोपनिषद किंवा 'तुज पाहता सामोरी । दृष्टी न फिरे माघारी ।।१।। तुज पाहता विठ्ठला । देहभाव हारपला ।।२।।' हा संत श्रीतुकाराममहाराज यांचा सिद्धांत महत्त्वपूर्ण आहे. तर 'सहस्रदलाचे सेवटी । उभे तुर्येचे पाठी । चिन्मय मोती दिठी । दिसताहे ।।१।। अलक्ष मुद्रेचे लागता ध्यान । हारपले देहाचे देहभान । योगी स्वरूपी मिळोन । स्वरूपचि होती ।।२।।' या श्रीज्ञानदेव तेहेत्तीशीतील या संदर्भात दोन सिद्धांताच्या ओव्या पृथ्वीमोलाच्या आहेत. या अवस्थेत गुरूशिष्याचे मनोमन जर एक झाले तर समाधान पूर्णपणे होते. 'समाधानं किं चित्तैकाग्रता।' ही श्रीशंकराचार्यांची व्याख्या येथे चिंतनीय आहे. पिंड ब्रह्मांडातील चार आणि चार अशा आठ देहांचा निरास येथे सहजच होतो. अशाप्रकारची खूण श्रीएकनाथमहाराज यांनी दाखविली असून ते या कृतीपाठाने अखिल विश्वात धन्य धन्य झाले. 'धन्य धन्य एकनाथा । चरणी माथा ठेविला ।।' असे श्रीनिळोबाराय, श्रीनाथांचेबद्दल धन्योद्गार काढतात. तर 'जनार्दनाचा एकनाथ । ध्वजा लाविली भागवत ।।' असे श्रीतुकाराममहाराजांच्या अधिकारी शिष्या श्रीबहिणाबाई आपले अभंगी श्रीनाथांचा अधिकार स्पष्ट करतात. या साक्षात्कारी जीवनात सर्व सुख साठलेले आहे. हाच सर्व आशय या मूळ अभंगात यथाक्रम आलेला आहे. यावरून सर्व कल्पना येईल असे वाटते.

## अभंग १८

श्वासोश्वासामाजी पहातसे वाट । म्हणोनी बोभाट केला असे ।।१।।
तूचि रामकृष्ण अगा नारायणा । जीवीच्या जीवना जीवी राहे ।।२।।
नाही तरी काय हवे *दासरामा* । अगा मेघःश्यामा सीताकांता ।।३।।

हे देवा, तुझी वाट मी प्रत्येक श्वासाश्वासात पहातो आहे. केवळ तुझ्या दर्शनाची उत्सुकता आहे, तळमळ आहे. म्हणूनच हा बोभाट केला आहे. आमचे भगवान श्रीमत् सद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे नाव नारायण आहे आणि निंबरगीकरमहाराज आणि भगवान रामकृष्ण परमहंस हे एकच आहेत हे निश्चित. म्हणून आपण या जीवाचे जीवन आहात, त्या आपण या जीवाचे ठायीच वास्तव्य करा अशी महाराजांची प्रार्थना केली आहे. 'आरती नारायणा । धन्य जगज्जीवना । सगुण ब्रह्ममूर्ती । काय तपोनिधाना ।।ध्रु।। सद्गुरू काडसिद्ध । तुकाराम अवतार । साधन संप्रदाय । वाढविला बडिवार ।।१।। गुरुलिंगजंगम नामे । जगप्रसिद्ध जहाला । दासराम शरण येता । अंतरीये बोध केला ।।२।।' या दासरामाने जी महाराजांची आरती केली आहे, त्यात येथे काय अभिप्रत आहे ते स्पष्ट होत आहे. नाही तरी या दासरामास आणि वेगळे खरे तर काय हवे? असा प्रश्न आहे. प्रभू रामचंद्राचे दर्शन हे तर अंतिम साध्य आहे. म्हणून शेवटच्या कडव्यात या अभंगी 'नाही तरी काय हवे दासरामा । अगा मेघःश्यामा सीताकांता ।।' असे म्हटले आहे. या ठिकाणी सीताकांत हा शब्द श्रीचिमडचे महाराज यांना अनुलक्षून आला आहे. महाराजांचे पत्नीचे नाव सीताबाई असे असून, महाराजांचे नाव रामचंद्र असे आहे. रामकृष्ण स्वरूप श्रीनिंबरगीकरमहाराज यांनी जीवी अखंड राहून, सीतापती रामप्रभूंनी निरंतर दर्शन द्यावे एवढीच श्रीरामकृष्णांचे चरणी वारंवार मागणी आहे. हाच भावार्थ मूळ अभंगातील तीन्ही कडव्यात समाविष्ट आहे.

***

## अभंग १९

सोडिलेची नाही तरी घेसी काई । सोडोनिया राही देहभाव ।।१।।
मग तुजलागी मिळे आत्मरूप । होसी निर्विकल्प एकदाची ।।२।।
निर्विकल्प पाहे समाधी अवस्था । ऐसी हे व्यवस्था *दासरामी* ।।३।।

देहभाव जर सोडला नाही तर स्वरूपानुभूती कशी घेता येईल? असा प्रश्न आहे. देहभाव लयाला गेला तर, आत्मरूपाचा साक्षात्कार होऊन एकदाच जीव निर्विकल्प होतो. 'अहं ब्रह्मास्मि' या बोधानेच ही अवस्था; देहाहंभाव गेला तर प्राप्त होते. 'अहं ब्रह्म उपदेशिले । निर्विकल्पी रत केले ।।१।। वेणीस्वामी अवघा भरला । विज्ञानासी अंत आला ।।२।।' असे श्रीसमर्थ शिष्या वेणाबाई यांनी आपल्या अनुभवाने हाच सिद्धांत येथे प्रस्थापित केला आहे. आत्मतेजाने देहभाव लयाला गेला की, निर्विकल्प अवस्थेत साधक समाधीच अनुभवतो. 'तया तेजामाजी देहभाव राहे । निर्विकल्प पाहे समाधी ते ।।' असे श्रीतुकाराममहाराज या दृष्टीनेच सांगत आहेत. मात्र एक, ज्याचे पूर्वपुण्य शुद्ध आहे, त्यालाच ही प्रतीती येते. म्हणून 'तुका म्हणे ज्याचे पूर्वपुण्य शुद्ध । तयासीच बोध होईल बापा ।।' असे श्रीतुकाराममहाराजांनी सांगून ठेवले आहे. हाच सारा विषय वरील मूळ अभंगात यथाक्रम आलेला आहे.

***

## अभंग २०

**समजीवन हे असे संजीवन । देहासी सुटून राही या ।।१।।**
**संजीवन स्थिती समाधीसी गेले । समाधी राहिले संजीवन ।।२।।**
**तेचि ज्ञानेश्वर गोविंदा भेटले । वंदिली पाऊले *दासरामे* ।।३।।**

आपले जीवन हे सम झाले की ते संजीवन होते. मग तेथे वैषम्य रहात नाही. विषमतेने व्यवहार आणि समतेने परमार्थ होतो. म्हणून समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्त्व हे मौलिक विचार मोठे चिंतनीय आहेत. महात्मा गांधीजींनी जगासमोर समता प्रस्थापित करून स्वातंत्र्य संपादन करता येते आणि विश्वबंधुत्त्व जगासमोर एक आदर्श म्हणून ठेवता येते, हे अहिंसा आणि सत्य या मार्गाने जगातील मानवांना दाखवून दिले आहे. माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांचे महात्माजी हे एक मोठे श्रद्धास्थान होते. 'ममता गेली की समता साधते' हे श्रीमामांचे हरिकीर्तनातील उद्‌गार मोठे चिंतनीय आहेत. 'अर्जुना समत्त्व चित्ताचे । तेचि सार जाण गा योगाचे । जेथे मन आणि बुद्धीचे । ऐक्य आथी ।।' या श्रीज्ञानेश्वर माऊलीचे वचनाप्रमाणे चित्ताचे समत्त्व हेच योगाचे सार असून, 'योगश्चित्तःवृत्तीनिरोधः।' हे श्रीपतंजलीचे सूत्र असून यौगिक प्रक्रियेचे दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. ही जी चैतन्यधारा किंवा चैतन्याचा एक स्त्रोत आहे, हेच खरे आपले जीवन समत्वात आले की संजीवन होऊन ते देहाला सुटून आहे असे जाणीवेत येते. या अवस्थेत प्राप्त होणारी समाधी ही सर्वश्रेष्ठ आहे. 'सर्व काळ नाम चिंतन मानसी । समाधान चित्तासी समाधी ते ।।' हे श्रीतुकोपनिषद समाधीचे रहस्यच निर्दिष्ट करते. यालाच श्रीज्ञानेश्वर माऊली 'हरिसमाधी' म्हणतात. योग समाधी, भाव समाधी, लय समाधी इत्यादी शब्दांनी समाधीचे स्वरूप स्पष्ट होते. भगवान रामकृष्णांची भावसमाधी तर स्वामी स्वरूपानंदांची सोऽहं समाधी ही लक्षणीय आहे. सोऽहं साधनेत होणारा लयच येथे अभिप्रेत आहे. समाधी कोणतीही असो, या धारणेतच प्रत्ययास येते. या संजीवन

स्थितीत श्रीज्ञानेश्वरमहाराज हे समाधिस्थ झाले. त्यामुळे संजीवन समाधीत ते संजीवन स्वरूपात आजही साक्षात्कार देतात, अशी श्रीज्ञानोबारायांची संजीवन समाधी आहे. 'ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तीदेवी ज्ञान । समाधी संजीवन हरिपाठ ।।' हे माऊलीचे हरिपाठातील वचन मोठे हृद्य आहे. 'समाधी हरिची समसुखेवीण । न साहेल जाण द्वैतबुद्धी ।।' समसुखात हरिसमाधी लागते. येथे द्वैत रहात नाही. असे या हरिसमाधीचे इंगित आहे. 'समबुद्धी घेता समान श्रीहरी । शम दमावरी हरि आला ।।' समबुद्धीने समसुखी होऊन शमदमावरी तो जीव हरिसमान होतो हे या सूत्राने माऊली नामसाधना स्पष्ट करते. चित्ताचे समत्व हे समबुद्धीचे कारण ठरते, तर 'राम राम जप समत्वे साधावा । अहंकार टाकावा अहंबुद्धी ।।' या श्रीनिवृत्तीनाथांचे सिद्धांताप्रमाणे, सकार आणि हकार या पारड्यातून अहंकार आणि त्याचा उगम ज्या अहंबुद्धीतून आहे, या अहंकाराचा व अहंबुद्धीचा निरास झाला की, नामजप समत्त्वाने साधला जातो, हे उघड आहे. हीच ती जीवनाची समता म्हणजे संजीवन स्थिती आहे. ही एक अमृत संजीवनी आहे. ज्यात संजीवन आहे, त्याला संजीवनी म्हणतात. ही अवस्थाच मोठी अमृतमय आहे. मृत नव्हे ते अमृत हेच सत्य आहे. म्हणून आत्मस्वरूप हेच खरे अमृत आहे. याशी एकरूप होणारा अमृतमय चिरंतन चिरकाल अविनाशीच होतो आणि त्याच स्थितीत अखंडत्त्वाने दर्शनोत्सुकांना साक्षात्कार देतो. श्रीज्ञानेश्वर माऊलींनी साक्षात्कार रूपाने श्रीगुलाबरावमहाराज यांना किंवा माझे पितृदेव श्रीमामा केळकर यांना जे दर्शन दिले, ते चैतन्य दर्शनच होते. म्हणून त्याला एक आगळे महत्त्व आहे. हाच सर्व आशय वरील मूळ अभंगात गुंफलेला आहे. माझे तीर्थरूपांचे नाव गोविंद. त्यांना लोक बापूराव म्हणू लागले. माझे आतेबंधू श्रीनारायणराव पटवर्धन किंवा हरिभाऊ हे मामा म्हणत यामुळे सर्वांचे तोंडी मामा या नावानेच उल्लेख होऊ लागला. मामांना जे माऊलीचे दर्शन झाले, त्यासंदर्भात कणकवली येथील विदेही साधू श्रीनानामहाराज बर्वे म्हणतात, 'सर्व सुखाचा हा गाभा । आळंदीचा देव उभा ।।१।। गोविंदा कारणे । सांगलीसी झाले येणे ।।२।। नानासी तो लळा । सदा जपे नाममाळा ।।३।।'

***

## अभंग २१

राजहंसालागी मोतीयाचा चारा । यात आला सारा परमार्थ ।।१।।
हंसरूप दावी स्वये हनुमंत । धन्य सद्गुरूनाथ वायुरूप ।।२।।
सत्य श्रीसमर्थ गुरूलिंगनाथ । त्याचे कृपांकित थोर थोर ।।३।।
स्वरूप लोपले तेचि ते दाविले । *दासराम* लोळे गुरूपायी ।।४।।

राजहंसाला मोत्याचाच चारा मिळतो, यातच सारा परमार्थ सामावला आहे. हंसस्थितीत साधक आला तरच त्याला मुक्तावस्था प्राप्त होते. जे अगदी उघड आहे. 'साधन काय करू स्वामी । सांगा यत्न कसा करू मी ।।ध्रु।। काय करावे कोठे जावे घ्यावे काय त्यजावे । जलप्रलयातील उदकासम ते परब्रह्म समजावे ।।१।। पाणी सांडूनी दुग्धचि घ्यावे ऐसा यत्न करावा । माया सांडूनी भजरंगात्मा नामी अनुभव घ्यावा ।।२।। उपाय करिता अपाय होतसे निजहीत काहिच न घडे । मुक्तपणाने बद्धपणाने साधन काहीच न घडे ।।३।।' हे पद भ. स.श्रीतात्यासाहेबमहाराज यांचे किंवा प.पू.श्रीमामांचे हरिकीर्तनात येत असे. साधन हे हंसक्षीर न्यायाने झाले पाहिजे, तरच अनुभव येतो. हे कामच मुळी हंसाचे आहे. हे हंसस्वरूप सत्संगतीत किंवा गुरुकृपेने आकलन होते. या दृष्टीने श्रीमीराबाई म्हणतात, 'संतनकी संग लगी तेरी अच्छी बनेगी । संतनकी संग डाग न लगी निर्मल होत शरीर ।।१।। हंसनकी गत हंस जाने वर्म न जाने का गा । मीरा के प्रभू गिरिधर नागर हरि चरण चित लगा ।।२।।' हंसाची गत हंसालाच माहिती, ती कावळ्याला कशी येणार? असा प्रश्न आहे. सत्संगतीने हे ज्ञान होते. ज्याचे संगाने कधी डाग तर लागणारच नाही, पण शरीर ही निर्मळ होते असे त्या संतसंगाचे महत्त्व आहे. 'संतसंगे अंतररंगे नाम बोलावे ।' या श्रीनाथोक्ती प्रमाणे संतसंगाने अंतररंगात प्रविष्ट झाले की नाम साधनेची हातोटी साधकास प्राप्त होते. 'अगा सर्व जीवांचे शरीरी । परमात्म हंसपदाची थोरी । अखंड असतसे गोचरी । परी नेणती अज्ञान ।।' असे एक सूत्र उत्तरगीतेच्या टीकेत

श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी स्पष्टपणे मांडले आहे. हा हंस तरी आपल्या देहातच सतत उड्या मारतो आहे. पण जीव हा बहिर्मुख असल्याने याचे ज्ञान त्याला होत नाही. 'बहुत दिवस चुकले सखे ग बहुत दिवस चुकले । राजहंस पाखरू माझे मजला सापडले ।।१।। बसुनी एकांती पाहू सखे ग बसूनी एकांती पाहू । उडूनी जाईल म्हणोनी तयाला डोळ्यात साठवूनी ठेवू ।।२।। घडोघडी अनुभव घेऊ सखे ग घडोघडी अनुभव घेऊ । ज्याचे सुख त्याने भोगावे न ये दुसऱ्याला देऊ ।।३।। कशी गत सांगू सखे ग कशी गत झाली सखे । स्वरूप वारे अंगी भरले वाचे बोलता न ये ।।४।।' या पद्यात हेच तत्त्व अत्यंत गोड शब्दात श्रीमहिपतींनी प्रकटपणे प्रकट केले आहे.

श्रीतात्यासाहेब महाराज हे एक चैतन्य वारे असून त्यांनी हंसरूप केवळ आपल्या कृपेने सद्‌भक्तांना दाखवून दिले आहे. असे ते एक महात्मे असून त्यांची खरीच धन्य आहे. श्रीतात्यासाहेबमहाराज आपले एका पद्यात म्हणतात, 'हंसावरती राम बैसुनी चालले हो पुढती । हंस कसा बघ उड्डाण करितो खाली आणि वरती ।।ध्रु।। खाली येता सवे उडतसे कोण जाणे गती । प्राणी निजला तरी हंस हा न सोडी निजस्थिती ।।१।। हंस गगनीच्या मुक्तामाळा देई आणुनी हाती । अगणित तारे ज्यात चमकती नाना रंग ज्योती ।।२।। डोळे झाकुनी पाहती जीव स्वरूप दिसे पाही । बाप सद्गुरू कृपा करील हा लाभ घडे देही ।।२।।' 'प्राणैवआत्मा' या श्रुतीप्रमाणे सहस्रदळस्थानात प्राण हाच चिद्‌रूपाने असून, त्याची गती दक्षिण शिखा मार्गाने भ्रूमध्याला येते व परत त्याच मार्गाने जाते. श्वसनाची गती वर गेली की, प्राणाची गती खाली येते व श्वसनाची गती खाली आली की प्राणाची गती वर जाते. त्याची गाठ साधनेने जीवनाची गती उर्ध्वगामी जर झाली तर हंस रूपाचे ज्ञान साधकास होते आणि प्रचिती येते. असे हे गुप्तपणे लुप्त असलेले स्वरूप ज्या महात्म्याचे कृपेने दृग्गोचर होते, त्यांचे चरणी दासराम लोळण घेत आहे. श्रीतात्यासाहेबमहाराज, श्रीदादासाहेबमहाराज आणि श्रीमामा हे मला तरी कधी निराळे असे दिसलेच नाहीत. यातच काय ते जाणत्यांनी जाणून घ्यावे. यापेक्षा काय म्हणता येईल? हाच सर्व आशय वरील मूळ अभंगात क्रमशः संक्षेपाने आला आहे असे वाटते.

***

# अभंग २२

अमृताचा स्वाद मजला मिळाला । अवीट तयाला वीट नाही ।।१।।
अमृताचे तळे वरोनी पाझरे । मुखात पसरे शिरेपोटी ।।२।।
हापूस आंबा तो लागलीया ओठी । कोण घेई पोटी रायवळ ।।३।।
*दासरामी* कैचा अनुभव दिला । गुरूलिंग बोलला निजकृपे ।।४।।

अमृताचा स्वादच असा आहे की त्याला कधी वीटच नाही. तो अवीट असा स्वाद आहे. अमृताचे तळे सहस्रदळातून पाझरू लागले की तोंडभर होऊन ते पोटात शिरून त्या जीवास तृप्तच करते. काही वेळा अगदी सामान्य माणसांचे तोंड निसर्गानेच गोड होऊन, तो जिभल्या चाटत असतो. तो एक खरा अनुभवच असतो. पण ही कल्पनाच नसल्याने त्यास हा अनुभव आहे याची कल्पना येत नाही. क्वचित तोंड अगदी वाईट होते. प्रकृती खराब असली की घडते. तसेच प्रकृती ठाकठीक असली की तोंड गोड होते, हे उघड आहे. एक मान्य तर दुसरे अमान्य का? असा प्रश्न आहे. हापूस आंबा ज्याने मनमुराद चाखला, तो कधीतरी रायवळ आंब्याकडे पाहील तरी काय? असा प्रश्न आहे. भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे कृपेचा वर्षाव झाला, त्याने मग काय घडणार नाही बरे? त्यांची कृपा हेच माझे जीवन आहे. त्यात समाधान आहे. आणि काही अपेक्षाच नाही हाच भाग वरील अभंगात यथाक्रम थोडक्यात ग्रथीत केला आहे.

***

## अभंग २३

आज तरी असे बुद्धाची जयंती । मना मिळे शांती निजरूपी ।।१।।
ऐसे हे पाहता कळले दासरामा । देवा तुझा प्रेमा नित्य नवा ।।२।।
प्रेमचि सप्रेम होऊनी ठाकले । प्रेमचि संचले प्रेमामाजी ।।३।।
प्रेमस्वरूपाचा घडला साक्षात्कार । प्रेमेची निर्भर *दासराम* ।।४।।

आज तर श्रीगौतमबुद्ध जयंती आहे. 'अहिंसा परमो धर्मः' म्हणणारे श्रीगौतमबुद्ध बोधीवृक्षाखाली जो बसले, तेथेच त्यांना बोध झाला आणि मनाला शांती मिळाली. 'बुद्धं शरणं गच्छामि । धम्मं शरणं गच्छामि ।' हे सूत्र येथे चिंतनीय आहे. ज्या ठिकाणी बसले असता श्रीगौतमांना बोध झाला, त्यालाच बोधीवृक्ष म्हणतात. सारे जग नश्वर आहे. म्हणून अहिंसेने आपण दयाशील झालो, क्षमाशील झालो, तरच जीवनात शांती प्राप्त होते, हा आदर्श श्रीगौतमबुद्धांनी जगापुढे ठेऊन आणि सर्व राजैश्वर्याचा त्याग करून चिरशांती हे उद्दीष्ट गाठले आणि मोठ्या प्रमाणावर धर्मप्रसार केला. हे वर्म जाणल्याने बुद्धदेवाचा प्रेमा नित्य नव्या रूपात अंतरी प्रगटला. प्रेमच साकार होऊन पुढे उभे राहिले, तो प्रेमात प्रेम मिळून गेले. नाही तरी परमेश्वर हा प्रेमरूपच आहे. विशुद्ध आणि निर्हेतुक प्रेम म्हणजेच ते ईश्वराचे स्वरूप आहे. प्रेमानेच कलह मिटतात आणि द्वंद्वावर विजय मिळविता येतो. अशा प्रेमस्वरूप साक्षात्काराने दासराम त्या प्रेमभरातच नाचू लागला, डोलू लागला. हाच आशय वर उधृत केलेल्या मूळ अभंगात क्रमशः समाविष्ट आहे.

***

## अभंग २४

माझा जो ईश्वर बुद्ध पैगंबर । ख्रिस्त, झरतुष्ट्र, बसवेश्वर ।।१।।
परी हे प्रथम पाहिले पाहिजे । परमेष्ठी लाहिजे परमामृत ।।२।।
जे असे प्रथम ते असे उत्तम । अरूप, अनाम, अद्वैत गा ।।३।।
*दासराम* तेथे राहतो निवांत । जेथ होय चित्त हरिमय ।।४।।

माझा जो ईश्वर आहे तोच श्रीगौतम बुद्ध, श्रीमहंमद पैगंबर, येशू ख्रिस्त, झरतुष्ट्र आणि लिंगायत धर्म संस्थापक श्रीबसवेश्वर आहे. पाण्यालाच कोणी नीर, सलील, निरू, वॉटर म्हणतात. शब्द कोठलाही असला तरी त्याने पाण्याचाच बोध होतो, निर्देश होतो. ज्याला तहान लागली आहे, तोच पाणी शोधतो. सारे धर्मप्रेषीत आणि धर्मसंस्थापक हे ईश्वरस्वरूप आहेत. या कोणत्याही नामाभिधानाने एक ईश्वराचाच बोध होतो, साक्षात्कार होतो. संत महात्म्यांना हे सारे धर्म, पंथ एकच आहेत. तत्त्वात त्यात कोठेच फरक पडत नाही, असला तर तो तपशीलात आहे. ज्या रंगाचे ग्लास ज्योतीवर ठेवावेत, तसा प्रकाश पडतो. आतील ज्योत एकच आहे. हा भगवान रामकृष्ण परमहंसांचा, त्याप्रमाणे भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराजांचा हा आत्मसिद्धांत सदैव उरी बाळगावा इतका महत्त्वाचा आहे. 'झरतुष्ट्र' हे नाम श्रीगुरूदेव रानडे यांना नामाला नाम झालेवेळी ऐकू आले होते, यात हेच रहस्य साठविले आहे.

परमामृत परमेष्ठी तत्त्वच प्रमुख आहे. जे प्रथम आहे ते उत्तम. अरूप, अनाम, अद्वैत आहे. तेथे द्वैत नाहीच. व्याकरणात प्रथम पुरुषालाच उत्तम पुरुष म्हणतात आणि भगवान त्यालाच परमात्मा म्हणतात. पुराण, पुरुषोत्तमयोग याच तत्त्वाचा प्रामुख्याने बोध करतो. येथे जर आपण निवांत राहिलो तर, या चिंतनाने चित्त हे हरिमय होते हाच आशय वर उधृत केलेल्या चोवीसाव्या अभंगात क्रमशः आलेला आहे.

## अभंग २५

पाहता खनाळ नुरे खळखळ । बैसता खनाळ काय नोहे ।।१।।
काय नोहे तेथे उरले ते काय । नोहे तोचि होय चतुर्देहवीण ।।२।।
चतुर्देहवीण असे तरी कोण । तयासी शरण *दासराम* ।।३।।

खनाळ दृष्टीला पडताच खळखळच मिटली. येथे वृत्ती कशी शांत होते? सारे कसे शांत शांत शांत होते ? मग जो खनाळात नेमाला, साधनाला अगर ध्यानाला बसला, आणि वृत्तीची बैठक झाली तर त्याला काय अशक्य आहे? मनात येईल ते सहज शक्य आहे. जेथे देहभाव लयाला गेला, तेथे मग काय राहिले? जे राहिले तेथे चत्त्वार देहांचा निरासच झालेला दिसून येईल. असे चत्त्वार देहाविरहित जे आत्मस्वरूप, त्याला हा दासराम शरण आहे. खनाळी साधना किंवा नेम करणारे नेमनिष्ठ श्रीअंबुरावमहाराज यांना दासबोधातील हा खनाळ शब्द अत्यंत प्रिय असून, त्यांचे प्रवचनातून वारंवार येत असल्याचे सहजच आठवले. हाच आशय वरील मूळ अभंगी यथावकाश थोडक्यात संक्षेपाने आला आहे.

***

## अभंग २६

महावीर तेथे आला वीरपणा । दया, क्षमा खुणा उमटल्या ।।१।।
शांतीसागर ते आचार्य शंकर । अद्वैत निर्झर जगामाजी ।।२।।
चैतन्ययुक्त ते आत्मतत्त्व श्रेष्ठ । गुरूलिंग वरिष्ठ *दासरामी* ।।३।।

सर्वश्रेष्ठ श्रीमहावीर वर्धमान हे जैन धर्मातील चोवीसावे तिर्थंकर, अवतारी पुरूष होते. 'जेणे मनासी जिंकीले । तेणे सर्वासी जिंकीले ।।' या श्रीमामांचे कवनाप्रमाणे, श्रीमहावीर हे जितेंद्रिय असल्याने जैन धर्माचे संस्थापक झाले. त्यांनी 'अहिंसा परमो धर्मः' हेच तत्त्व जगापुढे आदर्श म्हणून ठेवले. दया आणि क्षमा यांचे ते मूर्तिमंत स्वरूप होते.

श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य जगत्गुरू श्रीशंकराचार्य हे साक्षात् शंकरच भूतली अवतीर्ण झाले. ते मोठे शांतीसागर असून, जगामध्ये अद्वैत प्रवाह त्यांनी उज्ज्वलपणे अखंड प्रवाहित ठेवला. 'तुका करी प्रणिपात । दंडवत आचार्या ।।' असे भागवत धर्माचे कळस श्रीतुकाराममहाराज म्हणतात. माझे प.पू. पितृदेव श्रीमामा केळकर आपल्या एका अभंगात म्हणतात की, 'परमहंस करूणाकर । आचार्य जे जगदोद्धार ।।१।। माया मिथ्या ब्रह्म सत्य । जगा दाविती प्रचित ।।२।। दास घाली दंडवत । नामे शंकर साक्षात ।।३।।' ज्यात रुपांतर, स्थित्यंतर आणि अवस्थांतर नाही असे ब्रह्म सत्या असून ज्यात रूपांतर, स्थित्यंतर, अवस्थांतर असणारे हे जग मिथ्या आहे याची रोकडी प्रचिती आपल्या सिद्धांताने 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या शब्दात मानवासमोर उभी केली. म्हणून अद्वैत म्हणजे शंकराचार्य व शंकराचार्य म्हणजे अद्वैत असेच म्हणावे लागेल.

चैतन्ययुक्त श्रेष्ठ आत्मतत्त्व म्हणजेच भगवान श्रीसद्गूरू श्रीगुरूलिंगजंगममहाराज निंबरगीकर हे मोठे वरिष्ठ ब्रह्ममूर्ती जगद्व्यापी होऊन राहिले आहेत. त्यांचे पवित्र चरणी मस्तक ठेवणे पलीकडे दासरामास काय करता येईल?

अशाप्रकारे हा संजीवन पाठ येथे समाप्त होत आहे. तो त्यांचेच चरणी समर्पित करीत आहे.

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
|---|---|
| १ | **नासदीय सूक्तावरील ओविबद्ध टीका** |
| २ | **श्रीदासरामगाथा** (अभंग गाथा) |
| ३ | **श्रीरामदासबोध** (ओवीबद्ध) |
| ४ | **संजीवन पाठ** (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह) |
| ५ | **श्रीचांगदेव पासष्टी एक नाम कला** (ओवीबद्ध टीका) |
| ६ | **श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह** |
| ७ | **ग्रंथत्रयी** (आत्मबोधप्रत्ययामृत, दासराम विंशिका व पंचविशी) |
| ८ | **श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग** |
| ९ | **श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन** |
| १० | **श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह** (३६५ वचने) |
| ११ | **श्रीगुरुमहिमा** |
| १२ | **श्रीदासरामगाथा पुरवणी** |
| १३ | **श्रीदासराममहाराज आत्मचरित्र** |
| १४ | **श्रीदासराममहाराज कृत श्लोकरचना** |
| १५ | **श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव** (श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) |
| १६ | **रामदासस्वामीकृत आत्माराम** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १७ | **श्रीगुरुलिंगगीता** (२२८ पदे) |
| १८ | **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १९ | **श्रीदासराममहाराज लिखित लघु संतचरित्रे** |
| २० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित) |
| २१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** |
| २२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** |
| २३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** (१०८) |
| २४ | **समर्थ रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) |

| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
|---|---|
| २५ | **श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ) |
| २६ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) |
| २७ | **ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) |
| २८ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) |
| २९ | **श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह) |
| ३० | **परमार्थ प्रश्नोत्तरी** |
| ३१ | **श्रीदासराम चिंतनिका** (श्रीदासराममहाराज लिखित लेख संग्रह) |
| ३२ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) |
| ३३ | **अक्षरे चैतन्याची भाग-१** (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३४ | **अक्षरे चैतन्याची भाग-२** (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३५ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) |
| ३६ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) |
| ३७ | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) |
| ३८ | **श्रीनित्यपाठांमृत** (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने) |
| ३९ | **श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र** (श्रीदासराम लिखित) |
| ४० | **कै. सौ. सीतावहिनी चरित्र** |

# साधकोपयोगी ग्रंथ

(खालील यादीतील ग्रंथ हे श्रीदासराम ग्रंथमाला पुष्पयादी व्यतिरिक्त आहेत.)

१. श्रीहनुमद्-गुरू-चरित्र-बोध-सार
(श्रीमामामहाराज केळकर लिखित श्रीकोटणीसमहाराजांचे चरित्र)
२. श्रीगोविंद चरित मानस (प.पू.श्रीमामामहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
३. श्रवणी पाजुनी अमृतवाणी (प.पू.मामामहाराजांचे निवडक अभंगांचे विवरण)
४. नित्य नवा दिस जागृतीचा (श्रीदादांच्या ३६५ वचनांचे चिंतन)
५. श्रीहनुमत् गुरूचरित्र
(न.दा.दिवेकर कृत श्रीकोटणीसमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
६. श्रीदासरामगाथा (अभंग गाथा)
७. संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह)
८. श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह
९. श्रीनित्यपाठांमृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने)
१०. साधन संध्या (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
११. चिन्मय नित्यपाठ (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
१२. अमृतवाणी (प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचा अभंग गाथा)
१३. सन्मार्ग दीप (चिमड मठ प्रकाशित)
१४. श्रीनारायणीय शिष्यप्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या
(प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांची कीर्तने)
१५. श्रीगुरुलिंग गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)
१६. श्रीदासराम गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)
१७. श्रीदासराम वचनामृत (श्रीदादांची वचने)

## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| १ | चिमड संप्रदाय | २००५ |
| २ | श्रीरामदासस्वामी चरित्र | २००६ |
| ३ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग | २००६ |
| ४ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ५ | श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | २००७ |
| ६ | दासबोधातील तत्त्वज्ञान | २००७ |
| ७ | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह | २००८ |
| ८ | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | २००९ |
| ९ | साधन संध्या | २००९ |
| १० | अनंत अमृत स्मरण | २००९ |
| ११ | श्रीगुरुमहिमा | २००९ |
| १२ | श्रीज्ञानेश्वरी प्रसाद (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह) | २००९ |
| १३ | श्रीदासरामगाथा पुरवणी | २००९ |
| १४ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | २०१० |
| १५ | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०१० |
| १६ | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | २०१० |
| १७ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव(श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) | २०१० |
| १८ | श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र | २०१० |
| १९ | रामदासस्वामीकृत आत्माराम(श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०१० |
| २० | श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २०१० |
| २१ | श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २०१० |
| २२ | श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका) | २०११ |
| २३ | श्रीरामनिकेतनमधील आराधना | २०११ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| २४ | **ग्रंथत्रयी**(आत्मबोधप्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविशी) | २०११ |
| २५ | **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०११ |
| २६ | **अभंगदरबार (आवृत्ती १)** | २०११ |
| २७ | **सद्बोध दशक** (श्रीदादांच्या १० अभंगांवरील विवरण) | २०११ |
| २८ | **श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र** | २०११ |
| २९ | **श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०११ |
| ३० | **प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३१ | **पाठांतर सुलभ भगवत्गीता** | २०११ |
| ३२ | **श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे** | २०११ |
| ३३ | **श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध** (निवडक अभंग विवरणासह) | २०११ |
| ३४ | **प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३५ | **महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र** | २०११ |
| ३६ | **तो हा दासबोध** (दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) | २०११ |
| ३७ | **श्रीदासराममहाराज चरितामृत** | २०११ |
| ३८ | **श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र** | २०११ |
| ३९ | **श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ४० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित) | २०११ |
| ४१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** | २०११ |
| ४२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** | २०१२ |
| ४३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** (१०८) | २०१२ |
| ४४ | **प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र** | २०१२ |
| ४५ | **श्रीदासरामगीतम्** (श्रीदादांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) | २०१२ |
| ४६ | **श्रीदासराममहाराज वचनसंग्रह** (३६५ वचने) | २०१२ |
| ४७ | **चैतन्यब्रह्म** | २०१३ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ४८ | **श्रीदासराममहाराजकृत वायुलहरी** (विवरणासह) | २०१३ |
| ४९ | **स.रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) | २०१३ |
| ५० | **श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ) | २०१३ |
| ५१ | **चिमड संप्रदायातील पंचपदी** (विवरणासह) | २०१३ |
| ५२ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग -१** | २०१४ |
| ५३ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) | २०१४ |
| ५४ | **श्रीदासरामायण** (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र) | २०१४ |
| ५५ | **श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत** | २०१४ |
| ५६ | **श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ** (विवरणासह) | २०१४ |
| ५७ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग-२** | २०१५ |
| ५८ | **अभंग दरबार** (आवृत्ती २ री) | २०१५ |
| ५९ | **श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध) | २०१५ |
| ६० | **आत्मारामपाठ** (श्रीदादांच्या २० अभंगांवरील विवरण) | २०१५ |
| ६१ | **ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१५ |
| ६२ | **श्रीमद्‌दासबोधातील प्रपंचयोग** | २०१५ |
| ६३ | **अभंग दरबार भाग - २** | २०१५ |
| ६४ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) | २०१६ |
| ६५ | **श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह) | २०१६ |
| ६६ | **नासदीयसूक्त विवरण** | २०१६ |
| ६७ | **श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण** | २०१७ |
| ६८ | **पाठांतर सुलभ भगवद्‌गीता आवृत्ती दुसरी** | २०१९ |
| ६९ | **दासबोधातील परमार्थ योग** | २०१९ |
| ७० | **चांगदेवपासष्टी एक नामकळा** (विवरणासह) | २०१९ |
| ७१ | **परमार्थ प्रश्नोत्तरी** (पुनर्मुद्रण) | २०१९ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ७२ | **चिन्मयबोध** (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह) | २०१९ |
| ७३ | **श्रीदासराम चिंतनिका** (लेख संग्रह) | २०१९ |
| ७४ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) | २०१९ |
| ७५ | **अक्षरे चैतन्याची भाग-१**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७६ | **अक्षरे चैतन्याची भाग-२**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७७ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) | २०२० |
| ७८ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) | २०२० |
| ७९ | **श्रीनिंबरगी संप्रदाय दर्शन** (सचित्र मार्गदर्शन पुस्तिका) | २०२० |
| ८० | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) | २०२० |
| ८१ | **नित्यकीर्तनानंदा** | २०२० |
| ८२ | **चैतन्याचा महामेरू** (श्रीदादांचा जन्मशताब्दी गौरवग्रंथ) | २०२० |
| ८३ | **सांप्रदायबोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८४ | **अभंग सुधा** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८५ | **श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध)(द्वितीय आवृत्ती) | २०२० |
| ८६ | **आरती संग्रह** (द्वितीय आवृत्ती) | २०२० |